CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २८ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३२९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार ; एकावर गुन्हा दाखल

**सोलापूर** : फाटलेला शर्ट शिवण्याचा बहाणा करुन आलेल्या एका नराधमानं घरात कोणी नसल्याचं पाहून घराचे दार बंद करुन नववीमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर जबरदस्तीने अत्याचार केला.शनिवारी सकाळी ११ च्या सुमारास ही दुर्दैवी घटना शहरातील एका भागात घडली.याप्रकरणी रविवारी जोडभावी पोलीस ठाण्यात बलात्कार व बाललैंगिक कायद्यान्वये गुन्हा नोंदला आहे.याप्रकरणी नराधमाला अटक केली आहे.शनिवारी पिडित मुलीची आई कामासाठी बाहेर गेली होती. पिडितेच्या घराशेजारी राहणारा व्यक्ती फाटलेला शर्ट शिवायचा आहे म्हणून घरात आला.पिडितेने त्याला आई कामाला गेली आहे परत या असे सांगितले.याचवेळी त्याने घराचे दार बंद करुन या मुलीवर जबरदस्तीने अत्याचार केला.ही गोष्ट आईला सांगितली तर तुला खल्लास करतो म्हणून धमकी दिली.

दुपारी दोनच्या सुमारास पिडितेचे आई घरी आली.तेव्हा तिने घाबरुन काही सांगितले नाही.रात्री १० वाजता झोपेतून उठून तिने रडत सारा प्रकार आईला सांगितला.रविवारी सकाळी शेजारी राहणाऱ्या नातलगाशी चर्चा करुन पिंडिता व तिच्या आईने जोडभावी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी तातडीने अत्याचार करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असुन,अधिक तपास महिला फौजदार व्हट्टे करीत आहेत.

# संडे ठरला 'पोलिटिकल वॉर'...

## सरकार-ठाकरे यांच्यातील संघर्ष चिघळणार शरद पवारांच्या वर्मी घातले घाव

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मराठवाड्याच्या भूमीत रविवारी 'पोलिटिकल मास्ट्र स्ट्रोक' साऱ्या महाराष्ट्राला पहायला मिळाला. राजकीय सभांमधून राजकीय धुराळा उडाला. परभणीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा झाली तर हिंगालीत शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी सभेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना संबोधित केले. बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची उत्तर सभा झाली.सभांमधील विधाने पाहाता सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना आडवे-तिडवे घेतले तर ठाकरेंनी सरकारच्या कारभाराची चिरफाड केली.धनंजय मुंढे,छगन भुजबळ यांनी तर शरद पवारांच्या वर्मी घाव घातले.**

हिंगोलीच्या रामलीला मैदानावर दुपारी ठाकरे यांची तोफ धडाडली. राज्यात 'ट्रिपल' इंजिन सरकार असा टेंभा मिरवला जात आहे. पण नुसत्याच थापा मारल्या जात आहेत. 'सरकार आपल्या दारी आणि योजना मात्र कागदावरी', 'सरकार आपल्या दारी आणि थापा मारतंय लय भारी ', हे सरकार नुसतं थापा मारतंय अशी खोचक टीका ठाकरे यांनी शिंदे - फडणवीस - पवार सरकारच्या 'शासन आपल्या दारी' या योजनेवर केली. त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोचरी टीका केली आहे.



आपले उपमुख्यमंत्री आत्ताचे. मी कोणालाही वाईट म्हणणार नाही. आता मी देवेंद्र फडणवीसांवर बोलणेच सोडून दिले आहे. कारण मी काहीही बोललो तरी त्याचा बोभाटा होतो. मी अगोदर त्यांना फडतूस बोललो होतो आता पण आता बोलणार नाही. मी त्यांना कलंकही म्हटले होते पण आता नाही म्हणणार. आता त्यांना थापाड्या म्हणणार होतो. पण आता नाही म्हणणार. कारण मी काहीही बोललो तरी त्याचा बोभाटा होतो. अरे टरबुजाच्या झाडालाही पाणी लागते, असा खोचक टोला उध्दव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांना लगावला. या टीकेनंतर पुन्हा एकदा राज्यात ठाकरे विरुद्ध फडणवीस सामना रंगण्याची शक्यता आहे.

### फडवीसांनी देखील दिले आव्हान

परभणीच्याच सभेत फडणवीस यांनी ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. आमचे विरोधक सकाळपासून आमच्यावर टीका करत असतात. सकाळी ९ वाजता एक भोंगा सुरु होतो अन् दिवसभर दुसरे भोंगे सुरु असतात. त्यांच्याकडे बोलायला काहीच नाही. विकासाचा एकही मुद्दा त्यांच्याकडे नाही. माझे त्यांना आव्हान आहे आहे की, एक तरी विकासाचा मुद्दा सांगा. फक्त बोटे दाखवून लोकांमध्ये परिवर्तन होणार नाही. जोपर्यंत हे परिवर्तन होत नाही, तोपर्यंत आम्ही तिघे गप्प बसणार नाहीत,असे सडेतोड उत्तर फडणवीस यांनी ठाकरे यांना दिले.

### कामातून उत्तर देईल-अजितदादा

बीडच्या सभेत अजितदादांनी विरोधकांच्या टीकेवर वेळ घालवता विकास कामांच्या मुद्यांवरच अधिक भर दिला.त्यातूनही विरोधकांना त्यांनी चिमटे घेतलेच.मी दिलेला शब्द पाळणारा नेता आहे,शब्द बदलणारा नाही,असे सूचक विधान करून त्यांनी शरद पवारांवर निशाणा साधला.मी देखील शेतकऱ्यांच्या पोटी जन्माला आलो आहे.विकासासाठी मी सत्तेत गेलो आहे.विरोधक जी टीका करतायेत,त्यात तथ्य नाही.मी त्यांना कामातूनच उत्तर देणार आहे,असेही ते म्हणाले.

### ५४ ठिकाणी माफी मागणार काय?

साहेब उपमुख्यमंत्री म्हणून अजितदादांना मान्यता द्या, भांडण मिटवून टाका,असे आवाहन छगन भुजबळ यांनी बीडच्या सभेत केले. साहेब तुमच्याबरोबर जे लोक भाषणे करत आहेत, त्यांना विचारा भाजपमध्ये सहभागी होण्यासाठी ५४ जणांनी सह्या केल्या. तुम्ही अजित पवार, जयंत पाटील, प्रफुल्ल पटेल यांना दिल्लीला जायला सांगितले. त्यांना वाटाघाटी करायला सांगितले. त्यावेळी मी आणि धनंजय मुंडे नव्हतो. माझ्या मतदार संघात आलात त्यावेळी तुम्ही म्हणालात की माफी मागतो की, मी भुजबळांना इथून उभे केले. आता गोंदियापासून कोल्हापूर पर्यंत ५४ ठिकाणी सर्वांची माफी मागणार का? असा सवाल भुजबळांनी पवारांना विचारला.

### मी शेतकऱ्याचा मुलगा पचनी पडत नाही काय?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे व शरद पवार यांच्यावर टीकेची झोड उठवली.विरोधक काही गुगल्या टाकून संभ्रम निर्माण करत आहेत.सरकार पडणार म्हणाले.मुख्यमंत्री बदलणार म्हणाले.अहो सरकार मजबूत झाले आहे.अजितदादा आल्यामुळे अजून आम्ही भक्कम झालो.अहो मी शेतकऱ्याचा मुलगा आहे.असा मुलगा मुख्यमंत्री झाला हे विरोधकांच्या पचनी पडत नाहीय. विरोधकांनी त्यांच्यावर किंवा आमच्यावर टीका करण्याशिवाय एकही विधायक सूचना आजवर केलेली नाही. त्यांना ऑनलाइनवरून लाईनवर आणण्याचे काम आम्ही केले आहे,असा टोला त्यांनी ठाकरेंना लगावला.

### आव्हाड पाया पडले

हसन मुश्रीफ यांनी मोठ वक्तव्य करत जितेंद्र आव्हाड यांच्याबाबत गौप्यस्फोट केला आहे. जितेंद्र आव्हाड हा भेकड माणूस आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला, त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या पाया पडला होता आणि निवडणूक न लढण्याबाबत बोलला होता, असे मुश्रीफ यांनी सांगितले.

### बीडला काय दिलात

धनंजय मुंडे यांनी बीडमध्ये झालेल्या सभेत बोलताना शरद पवारांना टार्गेट केले. बीड जिल्ह्याने साहेबांवर फार प्रेम केले. प्रेम केले पण त्या प्रेमाच्या पोटी साहेबांनी बीड जिल्ह्याला काय दिलं हा सवाल आहे, असे मुंडे म्हणाले.

## एटीएम कार्डची अदलाबदल करत महिलेस फसवले

सुराज्य/सोलापूर

पैसे काढण्यासाठी गेलेल्या महिलेस एका अनोळखी इसमाने एटीएम कार्डची अदलाबदल करून त्यांच्या एटीएममधून २० हजार रुपये काढून घेऊन फसवणूक केल्याची घटना २७ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी अडीच ते तीन वाजण्याच्या दरम्यान सात रस्ता येतील बिग बाजार समोरील एटीएम मध्ये घडली.



याप्रकरणी सरला वसंतराव धुमाळ (वय-६०,रा.कमला नगर,विजापूर रोड) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हा गुन्हा तब्बल आठ महिन्यानंतर दाखल करण्यात आला असून,या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मोरे हे करीत आहेत.

## दिवसभरात केव्हाही रक्षाबंधन करता येईल

### पंचांगकर्ते मोहन दाते यांचे स्पष्टीकरण

सुराज्य/सोलापूर

देशभरात येत्या बुधवारी (३० ऑगस्ट) राखी पौर्णिमेचा सण साजरा होत आहे. राखी पौर्णिमा जवळ आल्यानंतर राखी बांधण्यासाठी नक्की काय मुहूर्त आहे, याची सर्वत्र चर्चा सुरू होते. मात्र राखी पौर्णिमेच्या पारंपरिक सणाला भावाच्या हातावर राखी बांधण्यासाठी कोणत्याही वेगळ्या मुहूर्ताची आवश्यकता नाही, अशी माहिती 'दाते पंचांगकर्ते'चे मोहन दाते यांनी दिली आहे.



रक्षाबंधन हा सण विवाह, मूंज अथवा वास्तुशांत याप्रमाणे मंगल कार्य नसून सामाजिक आणि कौटुंबिक उत्सव आहे. त्यामुळे बुधवारी भद्रा काल असला तरी दिवसभरात आपल्या सोयीने केव्हीही रक्षाबंधन साजरे करता येईल, असं मोहन दाते यांनी स्पष्ट केलं आहे.

पूर्वी राखी पौर्णिमेचा अर्थ बहिणीने भावाला राखी बांधणे एवढाच अभिप्रेत नव्हता. त्याकाळी रक्षाहोमाद्वारे रक्षासूत्र तयार करून ते राजाला बांधले जायचे. अशा पद्धतीने रक्षाबंधन विधिवत करण्यासाठी भद्राकाल वर्ज्य केला जात असे. ज्यांना विधिवत रक्षाबंधन करावयाचे आहे त्यांनी भद्राकाल म्हणजेच रात्री ९ वाजून २ मिनिटांनंतर रक्षाबंधन साजरे करावे. राखीपौर्णिमा हा बहीण-भाऊ, मित्र, समाजबांधव यांच्यातील सामाजिक सलोखा राखणारा उत्सव असल्याने तो मोठ्या उत्साहाने साजरा करावा, असे दाते यांनी सांगितले.

### मांडवे हद्दीत पुणे -पंढरपूर महामार्गावर दुर्घटना

## एसटी बस व टिप्परच्या अपघातात एक जण ठार, १६ जखमी

सुराज्य/नातेपुते

पंढरपूर-पुणे महामार्गावर नातेपुतेपासून चार किलोमीटर अंतरावर मांडवे हद्दीत (तालुका माळशिरस) येथे एसटी बस व टिपरच्या अपघातात एसटी बस मधील १३ प्रवासी जखमी झाले असून टिप्पर चालक अपघातात जागीच ठार झाला आहे.

पुणे येथून मंगळवेढाकडे जाणारी एसटी बस (एम. एच १४ बी.टी.३१२२) ही पुणे पालखी महामार्गावरून मंगळवेढाकडे दुपारी १२च्या सुमारास निघाली असता विरुद्ध दिशेने येणारा टिपर (क्रमांक एम.एच.४६ बी.बी.२२४३) यांची समोरासमोर धडक झाल्याने यामध्ये टिप्पर चालक शंकर कुमार मंडल (वय २४, राहणार पोर्निया बिहार) हा जागीच ठार झाला असून या अपघातात एसटी बस मधील १३ प्रवासी जखमी झाले आहेत.



यामध्ये १) किसन गुलाबराव बारवकर, २) सदाशिव दादा शेळके, ३) फुलाबाई ज्ञानोबा राऊत, ४) ज्ञानोबा तुकाराम राऊत ५)जालिंदर काशिनाथ टिंगरे शारदाबाई शिवाजी फलके %) आशाबाई नामदेव आघाव ८) अभिषेक पिंटू राठोड ९) निकिता कृष्णकांत केदले १०) सुदर्शन विठ्ठल खानगावडे ।। सिध्दनाथ नारायन अवताडे १२ रामचंद्र बारवकर १३ मनोहर रंगनाथ पदे हे किरकोळ जखमी झाले असून यांच्यावर नातेपुते येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच त्यापैकी १ ) सुदर्शन विठ्ठल तानगावडे २) अभिषेक पिंटु राठोड ३) मनोहर रंगनाथ पंदे हे प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना सोलापूर येथील शासकिय रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. ही घटना नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांना समजताच पोलीस कर्मचाऱ्यासह घटनास्थळी भेट घेऊन घटनास्थळी अपघाताचा पंचनामा केला. यावेळी माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी एसटी बस अपघातातील जखमी प्रवाशांना तत्काळ मदत करून आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधून अपघाताची माहिती दिलीफ आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर्स यांना अपघातातील जखमींना तात्काळ उपचार करण्याचे आदेश दिले.

## आर टी ई अंतर्गत शाळा प्रवेशासाठी यंदा कमी अर्ज

सुराज्य/सोलापूर

मोफत शिक्षणाचा अधिकार अंतर्गत एकूण २०९७ रिक्त जागा असताना २०२३ /२४ या शैक्षणिक वर्षासाठी यंदा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे फक्त ८९१ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

सहा ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत सक्तीचे शिक्षण मिळावे.ते शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहू नये. सरकारने मोफत शिक्षणाचा अधिकार राईट टू एज्युकेशन हा कायदा अंमलात आणला आहे. पहिली ते आठवी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकणाऱ्या मुलांनाच येथे प्रवेश दिला जातो.

आरटीई शिक्षणांतर्गत विविध शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रतिवर्षी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने जिल्ह्यातून अर्ज मागणी करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून यंदा २०२३/२४ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार शिक्षण विभागाकडे आतापर्यंत फक्त ८९१ अर्ज प्राप्त झाले आहेत. शिक्षण विभागाकडून अर्ज करण्यासाठी देण्यात आलेली अंतिम मुदत आता संपली आहे. खरे तर आरटीई अंतर्गत असलेल्या एकूण जागांपेक्षा प्रवेशासाठी जिल्हाभरातून जास्तीचे अर्ज येणे अपेक्षित होते मात्र तसे न होता कमी अर्ज प्राप्त झाले आहेत. आपल्या पाल्यांना आरटीई अंतर्गत प्रवेश मिळवण्यासाठी पालकांनी पुढाकार घेऊन पुढे येण्याची सध्या गरज असल्याचे शिक्षण विभागाकडून बोलले जात आहे. मात्र विद्यार्थ्यांबरोबर पालकही शिक्षणाकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे.

## कर्ज देण्याचे आमिष दाखवून दीड लाखांची फसवणूक

सुराज्य/सोलापूर

तीन अज्ञात मोबाईल क्रमांकाच्या धारकांनी फिर्यादी यांना वेळोवेळी फोन करून व्हाट्सअप चॅटिंग करत पन्नास हजार रुपयांचे कर्ज देण्याचे आमिष दाखवून १ लाख ४७ हजार ४०० रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना उघडकिस आली आहे.

ही घटना २५ मे २०२३ ते १४ जून २०२३ दरम्यान नवी मुंबई येथे घडली.चाँद मोहम्मद शेख (वय-४४, रा.अंबिका नगर, भाग ३ मजरेवाडी, सध्या -नवी मुंबई) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ८९८१३४८३१५, ७७४८९७९६२७ आणि ९०३८४२७२७६ या क्रमांकाच्या इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच हा गुन्हा एन.आर.आय पोलीस ठाणे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय येथे वर्ग केला आहे,असे फिर्यादीत म्हटले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या बया, बाहेर तुमची ही भाशा!

## उजनीतून विमानसेवेचे ठिकाण निश्चित

### करमाळा तालुक्यातील कुगावलाही फायदा

सुराज्य/टेंभुर्णी

हनुमान जन्मभूमी कुगाव पंढरपूर पुण्याचा प्रवास स्वस्तात आणि जलद व्हावा म्हणून उजनी धरणातून विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून धरणातील तीन ठिकाणांची पाहणी करण्यात आली असून, त्यातील दोन ठिकाणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीची ठरणार आहेत. त्यामुळे इंदापूरजवळील कालठण हे ठिकाण निश्चित करण्यात आले असून, तसा अहवाल नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाला पाठविण्यात आला आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांच्या मागणीनुसार उजनी धरणातून विमानसेवा सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्या पार्श्वभूमीवर धरणाच्या दरवाजाजवळ एक ठिकाण विमानसेवेसाठी उत्तम आहे. मात्र, धरणाच्या सुरक्षिततेच्या कारणावरून धरणाजवळ परवानगी देता येणार नाही, असे उजनी जलाशय व्यवस्थापन विभागाने स्पष्ट केले तर कुंभारगाव परिसरातील ठिकाणी परदेशातून विविध पक्षी येतात आणि त्या ठिकाणी पक्षी निरीक्षण केंद्र आहे. त्यामुळे त्या ठिकाणालाही मान्यता देता येत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आता कालठणची जागा निश्चित करण्यात आली आहे.




उजनी धरणातून विमानसेवा सुरू करण्याच्या निमित्ताने काही दिवसांपूर्वी पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून खासगी तांत्रिक तज्ज्ञांकडून पाहणी झाली. त्यांनी तीन ठिकाणांची पाहणी केली असून त्यापैकी इंदापूरजवळील कालठण हे ठिकाण सोयीचे असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी आमच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

**– रावसाहेब मोरे,**
कार्यकारी अभियंता, उजनी जलाशय व्यवस्थापन

### पंढरपूर व हनुमान जन्मभूमीला सहजपणे जाता येणार

उजनी धरणातून विमानसेवा सुरू केल्यानंतर नगर, पुणे, सोलापूर, लातूर यासह विविध जिल्ह्यांतील नागरिकांना विनाविलंब सोयीस्कर प्रवास करता येणार आहे. सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग जवळ असल्याने कुगाव च्या हनुमान जन्मभूमीला, पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्यांचीही सोय होणार असून त्यांना कमी वेळेत त्या ठिकाणी पोचता येणार आहे. पर्यटनवाढीसही मदत होणार आहे. दरम्यान, कालठण ते कुगाव परिसरात वर्षभर पाणी (४५ ते ५० मीटर खोल) असते. त्या ठिकाणी उभा व आडवा आठ किलोमीटरचा मार्ग विमानसेवेसाठी आहे. या पार्श्वभूमीवर त्या परिसरात विमानसेवा सुरू होण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत.

काही दिवसांपूर्वी पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून खासगी टेक्निकल एक्स्पर्ट यांनी त्या ठिकाणांची पाहणी केली आहे. आता नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाकडून त्यांच्या अहवालाचा अभ्यास करून त्यांच्याकडून पुन्हा स्वतंत्रपणे पाहणी केली जाणार आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असेही सांगण्यात आले. तत्पूर्वी, त्याला उजनी जलाशय (जलसंपदा) आणि पर्यावरण विभाग व एअर ट्रॅफिक कंट्रोल विभागाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

CMYK

# शिक्षण धोरणाचे काय होणार?

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत शालेय शिक्षणाचा अंतिम राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) नुकताच प्रसिद्ध केला. पुढील वर्षीपासून हा आराखडा लागू केला जाऊ शकतो. त्याप्रमाणे इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकाव्या लागणार आहेत. त्यापैकी दोन भारतीय भाषा असतील तर अकरावी आणि बारावीसाठी दोन भाषा शिकाव्या लागतील, ज्यापैकी एक भारतीय भाषा असेल. त्यानुसार भारतीय भाषांना शालेय अभ्यासक्रमाचा अविभाज्य घटक बनवले गेले आहे तसेच विद्यार्थ्यांना विविध विषयांची निवड करण्याचे स्वातंत्र्य देत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार देशाच्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्यासाठी हा नवा आराखडा तयार करण्यात आल्याचा केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा दावा आहे. शिक्षण मंत्रालयाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली १३ तज्ज्ञांची समिती नेमली होती. मूल्यांवर भर देण्यात आलेल्या या आराखड्यात ज्ञानविषयक दृष्टिकोन ठेवून आशय, भाषा शिक्षण, अध्यापनात साधने, स्रोतांचा उपयोग आणि तत्त्वज्ञानाचा आधार दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी २००५ मध्ये काँग्रेस सत्तेत असताना अभ्यासक्रम आराखडा बदलण्यात आला होता. एप्रिल २०२३ मध्ये पहिल्यांदा राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याचा ६४० पानांचा मसुदा जाहीर करण्यात आला. त्यात सुधारणा केल्यानंतर आता ६०० पानांचा नवा आराखडा सादर करण्यात आला आहे. मसुद्यातील सुधारीत तरतुदींनुसार शालेय शिक्षणाला चार गटात विभागण्यात आले आहे. (फाऊंडेशनल) पहिला टप्पा (पूर्व प्राथमिक ते इयत्ता दुसरी) या गटातील विद्यार्थ्यांचे वय ३ ते ८ वर्षांपर्यंत असावे, दुसरा टप्पा (इयत्ता दुसरी ते पाचवी) या गटातील विद्यार्थ्यांचे वय ८ ते ११, तिसरा टप्पा (इयत्ता सहावी ते आठवी) विद्यार्थ्यांचे वय ११ ते १४ आणि चौथा टप्पा (इयत्ता नववी ते दहावी) विद्यार्थ्यांचे वय १४ ते १८ असावे, असे सांगण्यात आले आहे. तिसऱ्या टप्प्यापर्यंत



दोन भारतीय भाषा शिकवण्याची शिफारस करण्यात आली आहे. दहावीपर्यंत तीन भाषा शिकवण्याची तरतूद असून यापैकी दोन भाषा स्थानिक भारतीय असाव्यात असे बंधन घालण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यात भाषांव्यतिरिक्त गणित, कला, शारीरिक शिक्षण, विज्ञान, समाजशास्त्र आणि व्यावसायिक शिक्षण हे विषय विद्यार्थ्यांनी शिकणे अपेक्षित आहे. चार हजार संस्थांच्या अभिप्रायानंतर भारतीय भाषांबद्दल मसुद्यात बदल करण्यात आले आहेत. सुधारित मसुद्यात सध्या तरी वार्षिक पद्धतीला अनुकूलता दर्शवली आहे. राज्यांनी सेमिस्टर पद्धतींची तात्काळ अंमलबजावणी करण्यावर आक्षेप व्यक्त केल्यानंतर हा बदल सुचविला आहे. विविध विषयांसंदर्भातील पाठ्यपुस्तकांचा विकास करण्यासाठी एनसीएफकडून आराखडा सादर करण्यात आला आहे. एनसीएफने इयत्ता तिसरी ते १२ वी पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये बदल सुचविल्यानंतर एनसीईआरटीने १९ सदस्यांची समिती स्थापन केली असून ही समिती पाठ्यपुस्तक आणि पूरक साहित्याची रचना करेल. यासाठी संबंधित विषयातील तज्ज्ञांचीही मदत घेण्यात येईल. नवीन पाठ्यपुस्तके २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सादर होण्याची शक्यता आहे, असे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने अलीकडेच जाहीर केले होते. सध्या अभ्यासक्रमात असलेली पाठ्यपुस्तके राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २००५ नुसार तयार करण्यात आली होती. राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा हे दोन्हीही राज्यांवर बंधनकारक नाही. कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने नुकतेच जाहीर केले की, ते राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करणार नाहीत. शिक्षणाच्या क्षेत्रातही राजकारण आणले जात आहे. आता काळानुरूप बदल अपेक्षित आहे. आज पुस्तकी ज्ञान घेऊन तरुणांची बेरोजगारी वाढत आहे. त्यामुळे तरुणांमध्ये एकप्रकारची शैथिल्य आले आहे. हे देशासाठी घातक आहे. आज जगात सुरू स्पर्धा पाहाता कौशल्य शिक्षण महत्त्वाचे झाले आहे. उद्योग क्षेत्राला उभारी द्यायचे झाल्यास कौशल्य शिक्षणाशिवाय पर्याय नाही. भाजपेतर राज्यांनी या शिक्षण धोरणाकडे पाठ फिरवली आहे. भविष्यात भाजपच्या सत्तेला तडा गेल्यास येणारे नवे सरकार हे धोरण मोडून टाकले तर शिक्षणाचा बट्ट्याबोळच.

## वाढदिन विशेष

# प्रेरक जगद्गुरु

**मानवाच्या कल्याणासाठी ''गुरु'' ही संस्था भगवंतांनी या पृथ्वीतलावर निर्माण केली. गुरुच्या स्वरुपात भगवंतांनी वेळोवेळी अवतार घेऊन भक्तजनांना मार्गदर्शन केले आहे आणि सन्मार्गाला लावून उद्धाराचा राजमार्ग दाखविला आहे. या कलियुगाच्या दुष्ट्य फेण्यामध्ये सामान्य माणूस भरकटून विनाशाकडे जाण्याची शक्यता असल्यानेच परमेश्वराने श्रेष्ठ अशी गुरु परंपरा स्थापन केली. आपल्याला ज्ञान देतो, सन्मार्ग दाखवतो तो गुरु. म्हणूनच भारतीय संस्कृतीत गुरुला अतिशय महत्व आहे. अध्यात्मापासून विज्ञानापर्यंत 'गुरु' या शब्दाचे फार मोल आहे. असे गुरु म्हणजेच प. पू. श्री. श्री. १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी होते. काशीज्ञान पिठाचे ८६वे जगद्गुरु आहेत. श्रीश्री १००८ जगद्गुरु रंभापुरी, उज्जैनी, श्रीशैल, श्रीकेदार या चार पीठाधिपतीच्या सानिध्यात काशी येथे जंगमवाडी मठात वयाच्या ३५व्या वर्षी समारंभपूर्वक पट्टाभिषेक झाला.**

विजापूर जिल्ह्याच्या बदामी तालुक्यातील लोगगुसी गांबी, माध्यमिक शिक्षणानंतर वयाच्या १३व्या वर्षी गुळेदगुड येथील अमरेश्वर मठाचा त्यांना पट्टाभिषेक झाला. सोलापूर येथील वीरशैव गुरुकुलात राहून त्यांनी संस्कृत अध्यापन केले. वारद पाठशाळेतून काव्यतिथ परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर उच्च शिक्षणासाठी काशीच्या जंगमवाडी मठात १८ वर्षे राहून संस्कृतच्या अनेक परीक्षा दिल्या. १९७३ साली 'शंकर वेदांत' हा विषय घेऊन आचार्य परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळाला. त्यामुळे त्यांना 'संपूर्णानंद सुवर्ण पदक' स्वामी विवेकानंद सुवर्ण पदक आणि अन्नप्रसाद सुवर्णपदक अशी तीन सुवर्णपदकांनी सन्मानित करण्यात आले.

१९८१ मध्ये त्यांना संपूर्णानंद विश्वविद्यालयाने विद्याचारणी (पीएचडी) ही पदवी प्रदान केली. विद्या अनुदान मंडळाने वीरशैव 'तत्वमय विमर्श' या शोध प्रबंधासाठी शिष्यवृत्ती दिली. विश्वविद्यालयाने त्यांच्या या शोध प्रबंधाला मान्यता देऊन डी. लिट ही अत्यंत गौरवास्पद पदवी प्रदान केली. या प्रबंधालाच उत्तर प्रदेश संस्कृत अकादमीने रुपये २५,०००/- चा शंकर पुरस्कार प्रदान करुन त्यांचा गौरव केला. प. पू. काशी जगद्गुरु, डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी म्हणजे ज्ञानाची सत्कारमूर्ती होय. त्यांच्या संपादकत्वाखाली 'श्री सिद्धांत शिखामणी' या संस्कृत ग्रंथाचा मराठी भावानुवाद प्रकाशित झाला आहे. मराठी भावानुवाद डॉ. चंद्रशेखर कपाळे यांनी केला आहे. श्री जगद्गुरुच्या अमृत मधुर चिंतनशील आणि प्रासादिक शैलीतील आशीर्वचनाचा मराठी भावानुवाद 'जन्म हा अखेरचा' या ग्रंथाच्या रुपाने प्रकाशित झाला. या पंथाचे १२ भाग प्रकाशित झाले. त्यानंतर १२ भागांचा एकत्रित ग्रंथ प्रकाशित झाला. भावानुवाद डॉ. श. पसारकर यांनी केला आहे. शेवभारती शोध प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना केली आहे. दर्जेदार प्रेमासिक १६ वर्षांपासून प्रकाशित होत आहे. याचा माशेषसिद्धांत पंडित अशा तीन परीक्षा दरवर्षी डिसेंबर महिन्यात घेतल्या जातात. २० हजार पुढे विद्यार्थी परीक्षेस बसतात.

महास्वामीजींच्या उपस्थितीत लातूर येथे पहिले भव्य अखिल भारतीय वीरशैव मराठी साहित्य संमेलन आयोजित केले होते. वैद्यकीय अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या गरीब आणि होतकरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची योजना त्यांनी ६१व्या वाढदिवसापासून म्हणजे सन २००७ पासून ते आजपावेतो २०२३ अखेर ५५० विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये १०००/- शिष्यवृत्ती सुरु केली. त्यांनी त्यांच्या गुरुदक्षिणा आणि तुलाभारातून आलेला खर्च निधीमधून शिष्यवृत्ती सुरु केली आहे. महास्वामीजी केवळ एक माध्यम आहेत. या माध्यमातून समाजाचे कार्य समाजच करुन घेत आहे. अशा प्रकारचे धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक कार्य अनादिकालापासून काशी महापीठातर्फे होत आहे. पुढे अनंतकालपर्यंत होत राहणार आहे.



परमपूज्य महास्वामीजींच्या सन १९९७ मध्ये कोटी बिल्वार्चन महोत्सवाचा आनंद लक्षावधी भक्तांनी १२६ दिवसपर्यंत घेतला. महास्वामीजींचा सन २००७ मध्ये एकसष्ठी समारंभ २२ ऑगस्ट ते २९ ऑगस्टमध्ये हजारो भक्तांनी मोठी प्रमाणात साजरी केली. श्री काशीपिठाचे लिंगैक्य जगद्गुरु विरभद्र शिवाचार्य महास्वामीजींनी 'विभूती' या नावाचे नियतकालिका तेलुगू भाषेमध्ये सुरु केले व काही दिवसात बंद पडले. नंतर सन १९९२ मध्ये जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी त्रैमासिक म्हणून विभुते वैभव या नावाने चालू केले. काशी जगद्गुरु श्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या पिठारोहणाचा रौप्य महोत्सव श्री काशी जगद्गुरु लिंगैक्य श्री १००८ विश्वेश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या पुण्य आराधन रौप्य महोत्सव या निमित्ताने ७ जुलै ते ११ नोव्हेंबर २०१४ या चातुर्मास काळात एक अद्भूतपूर्व आनंदोत्सव भव्य वैभवशाली उत्सवात पार पाडला. यावेळी श्री सिद्धांत शिखामणीचे १६ भाषेतील अनुवाद ग्रंथ एकाचवेळी प्रकाशित झाले.

परदेशात जाणारे पहिले जगद्गुरु काशी ज्ञानवाचे डॉ. चंद्रेशखर शिवाचार्य महास्वामी होय. रशियामध्ये शिवयोग प्रचार तसेच लिंगदीक्षा देण्यात आल्या. मास्को आणि सेंटपिटर्सबर्ग या शहरात वीरशैव तत्वज्ञान आणि भारतीय दर्शनाचा तुलनात्मक विषयावर महास्वामीजींचे आशीर्वचन व लिंगपूजेचे प्रत्यक्ष श्री सांस्कृतिकयाच रशियन भाषेत अनुवाद करुन ते रशियात प्रसिद्ध करण्याचे श्रेय काशी पिठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य होत.

अधिक मास हे पारमार्थिक साधनाकरिता अत्यंत श्रेष्ठ असून या महिन्यात जप, साधना, दान, धर्माचरण आदींच्या माध्यमातून आत्मोध्दार करुन घेण्यासाठी श्रेष्ठ वेळ समजली जाते. अधिकस्याधिफलं या उक्तिप्रमाणे समाज कल्याणाकरिता विश्वशांती धर्माभिवृत्तीचा शिवसंकल्प घेऊन अधिक मासामध्ये श्रीश्रीश्री १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य काशी महास्वामीजी हे १७ जुलै २०२३ ऑगस्टपर्यंत महाराष्ट्राची पुण्यभूमी असलेल्या पंढरपूरपासून प्रयागराज आणि पुण्यक्षेत्र श्री काशीपर्यंत अनेक क्षेत्रामध्ये इष्टलिंग महापूजा आशीर्वचन करत आपला प्रवास संपन्न केला. या एक महिन्याच्या कालावधीमध्ये त्यांनी भक्तांना रामेश्वरमध्ये जंगमवाडी मठ बांधण्याचा संकल्प केल्याचे सांगितले. रामेश्वर येथे एक एकर जमीन १० कोटीला घेऊन तेथे ४५ खोल्या व हॉल बांधण्याची संकल्पना भक्तांना सांगितली.

अशा या महान शिवाचार्यांच्या रुपाने काशीपिठाचा महाज्ञानी, दृढनिश्चयी, दयाळू, कल्पक, लोककल्याणकारी, परिश्रम आणि सात्त्विक अशा अलौकिक गुणांनी युक्त पिठाधिपती लाभल्याने भक्तगणात त्यांच्याविषयी नितांत आदर, श्रद्धा निर्माण झाली असून त्यांनी घेतलेल्या प्रत्येक कार्यात लोकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महास्वामीजींचे मार्गदर्शन आणि शुभाशीर्वाद समाजाला निरंतर लाभत राहो, हीच त्यांच्या ७७व्या वाढदिवसानिमित्त श्री जगद्गुरु विश्वाराध्य चरणी प्रार्थना.

**- वसंत लवंगे, नरखेड.**

## टुडेज् ब्लॉग

# पिंड कसा घडत जातो?

**मनुष्याचा पिंड कसा घडत जातो? याचे चिंतन अनेक मानसशास्त्रज्ञांनी, समाजशास्त्रज्ञांनी केलेले आहे. ते वाचले पण जोपर्यंत स्वत:ला अनुभव येत नाही तोपर्यंत ते प्रत्ययाला येत नाही. ती व्याख्या पाठ होऊ शकेल पण ती आत्मसात झाली असे अनुभवाशिवाय म्हणता येणार नाही. असाच एक स्वानुभव.**

महाल/इतवारी भागात बालपण गेल्यामुळे महालच्या केळीबाग रोडवरच आंबेकर घी शॉप हे बालपणाचा अविभाज्य भाग बनले होते. त्यांच्याकडले तूप, लोणी हे अक्षरशः रक्तात गेले. आमच्या बालपणी सणासुदीलाच तूप वगैरे प्रकार परवडत असे. सणावारांचे दिवस आले की वडिलांसोबत आंबेकर घी शॉप मध्ये कडीचा डबा घेऊन जायचे आणि तत्कालीन परिस्थितीप्रमाणे कधी पाव किलो, कधी अर्धा किलो तूप घेऊन परतायचे हा नित्यक्रम होता. महाल सोडून पश्चिम नागपुरात रहायला आलोत तरी बरीच वर्षे महालातल्या फेरीत आंबेकरांच्या दुकानात फेरी नक्की असायची. तिथल्याशिवाय इतर कुठलेच तूप, लोणी आवडायला तयारच नव्हते.

नोकरीनिमित्त मुंबईत, ठाण्यात जवळपास एक तप वर्षे घालवलीत. दरवेळी नागपुरातून नोकरीसाठी परतताना दुपारच्या विदर्भ एक्सप्रेसने किंवा रात्री उशीराच्या सेवाग्राम एक्सप्रेसने परतणार असलो तर त्याचदिवशी सकाळी आंबेकरांच्या दुकानात चक्कर मारून तिथून एक, दीड किलो तुपाची खरेदी व्हायची. तेव्हढाच आपल्या नागपूरचा मुंबईत दुवा. ते तूप संपेपर्यंत आपण नागपुरातच आहोत अशी मनाची समजूत. 'दिलको बहलाने के लिए, गालिब खयाल अच्छा है' तसेही तुम्ही नागपुरी माणसाला नागपूरच्या बाहेर काढू शकता, नागपुरी माणसाच्या बाहेर त्याच्या आतले नागपूर काढू शकत नाही.

मुंबईत खूप जणांकडून तिथल्या खूप जणांकडल्या तूप लोण्याचे कवतिक ऐकले. आम्हाला जसे 'आंबेकर' तसे त्यांच्या त्यांच्या विभागातले 'आंबेकर' हीच मंडळी असतील म्हणून सगळ्यांच्या शिफारसी ऐकून तिथल्या तिथल्या तुपाची, लोण्याची चवही घेऊन पाहिली. अगदी 'आनंदाचे डोही आनंद तरंग' या चालीवरच्या सामंतांचे लोणी, सामंतांचे तूप, ठाण्यातल्या खंडेलवाल सगळ्या ठिकाणची चव घेऊन पाहिली पण 'तस्य तदेवहि मधुरम यस्य मनो यत्र संलग्नम' या संस्कृत सुभाषिताप्रमाणेच त्या सगळ्या ठिकाणी ते आमचे 'आंबेकर' नव्हते. अगदी माणदेशात सांगोल्याला असताना 'गोकुळ' वगैरे ब्रँण्डचेही तूप चाखून बघितले. खान्देशात शिरपूरला असताना ते गीर गायीचे अगदी दोन हजार रूपये किलोचे ए-टू टाईपचेही तूप एकदा चाखून बघितले. चंद्रपूरला सासुरवाडीला खेडेगावातून येणाऱ्या विक्रेत्यांनी आणलेले अस्सल गावराणी तूप पण खाऊन पाहिले पण दरवेळी कुठलेच तूप आंबेकरांच्या तुपाच्या तोडीचे नाही याची जाणीव अधिक पक्की झाली.

पुन्हा नागपुरात परतलो. तोवर आंबेकर घी शॉपची एक शाखा पश्चिम नागपुरात घराजवळच



राणाप्रताप नगरला उघडलेली होती. आता केळीबाग रोड पर्यंत गाडी दामटवण्याची गरज नव्हती. खूप आनंद झाला. आता मागल्या आठवड्यातलीच गोष्ट. घरातले तूप संपले होते. संध्याकाळी आंबेकरांकडे गेलो. त्यांच्याकडलाही तुपाचा स्टॉक नेमका संपलेला होता. सकाळी आलेला काही किलो तुपाचा स्टॉक संध्याकाळी सात पर्यंत संपणे म्हणजे त्या मालाच्या दर्जाची ग्वाहीच होती. मग त्यांच्याकडले अगदी शेवटचे उरलेले शंभर ग्रॅम तूप घेऊन परतलो. आता ते तूप किती दिवस पुरणार ? पण गेला संपूर्ण आठवडा खूप धावपळीचा गेला आणि सकाळी म्हणा, संध्याकाळी म्हणा त्यांच्याकडे तूप आणायला जाणे झालेच नाही. आज मात्र अगदी सगळी कामे बाजूला ठेऊन आंबेकरांकडे जायचेच ठरवले. तसे तूप म्हणजे अगदी जीवनावश्यक वस्तू वगैरे नाही पण ही किमया आंबेकरांकडल्या तुपाच्या चवीची, शुद्धतेची. मी माझ्याच शोध घेत गेलो आणि लक्षात आले की अरे, आपल्या बालपणापासून आपला पिंड तर आंबेकरांकडल्या तुपावरच पोसला गेलेला आहे. त्यामुळे आता इतर कुठलाही तुपाचा ब्रॅण्ड आपल्याला चालूच शकत नाही. हे आणि फ़क्त हेच तूप. आता यात कुणाला तरी आंबेकरांची जाहिरात वगैरे केल्याचा संशय येईलही. पण आंबेकरांना कधीच जाहिरातीची गरज नव्हती आणि नसेलही. ज्यांनी एकदा त्यांच्याकडल्या तुपाची, लोण्याची चव घेतली ते त्यांच्याशी कायमचे जोडले जातात हे अगदी खरी गोष्ट आहे. आणि त्यासाठी आंबेकरांना जाहिरातीची गरजच नाही. आणि एखाद्या खरोखर चांगल्या गोष्टींची आपल्याकडून जाहिरात होत असेल तर नक्की व्हावी असे मला मनापासून वाटते. आजच्या या दर सेकंदाला बदलत जाणा-या अनित्य जगात आम्हाला आमच्या बालपणाशी जोडून ठेवणारा दुवा म्हणजे आंबेकरांच्या तुपाची गेल्या पन्नास (कदाचित शंभरही. आम्हाला आमच्या आयुष्यातली पन्नास वर्षे आठवत आहेत.) वर्षात न बदललेली चव आणि शुद्धता. हे नुसते आंबेकर घी शॉप नाही तर आमच्या बालपणात, आमच्या आजीने, आईने वाढलेल्या पंक्तींची आठवण ताजी करणारी, आमच्या वडील, आजोबांचे हात धरून महालातल्या यांच्या दुकानात जाण्याच्या आठवणींची टाईम मशीन आहे. हे दुकान म्हणजे आमची नाळ नक्की कुठे पुरल्या गेलेली आहे, याची जाणीव सदैव जागृत ठेवणारा एक सांस्कृतिक ठेवा आहे.

**- राम.**

## जन्म हा अखेरचा

# शिष्यस्थल -३



षट्स्थल, अष्टावरण आणि पंचाचार याविषयी बरीच माहिती तुमच्या कानावरुन गेलेली असेल. गुरुने उपदेशिलेले शिवाचार, शिवध्यान आणि शिवज्ञान यावर शिष्याने नितांत निष्ठा ठेवावी. भक्तिचे श्रद्धाभक्ती, निष्ठाभक्ती, अवधान भक्ती, अनुभवभक्ती, आनंदभक्ती आणि समरसभक्ती असे सहा प्रकार आहेत. भक्ती सुदृढ होते तेव्हा तिला 'निष्ठाभक्ती' म्हणतात. स्वाती नक्षत्रातला एक पाऊस थेंब जेंव्हा शिंपल्यात पडतो, त्याचा मोती बनतो. इतर कुठेही पडलेला पाऊस मोती होत नसतो. त्याप्रमाणे गुरुचा शब्द न् शब्द जो आपल्या हृदयात जपून ठेवतो तो निष्ठावान शिष्य होय. श्रद्धाभक्ती परिणत झाली की निष्ठाभक्ती होते. आपल्या सर्व संपत्तीचे हरण केले आणि आपला कोणी शिरच्छेद केला तरीदेखील लिंगपूजेचा त्याग न करणे याला निष्ठाभक्ती म्हणतात, गुरुपदेशावर शिष्याची अशी नितांत निष्ठा असली पाहिजे.

**ब्रह्मांडबुद्बुदोद्भुतं मायासिन्धुं महत्तरम् ।।**
**गुरो: कवलयत्याशु कटाक्षवडवानल: ।। १७.६३।।**

संसाराला सागराची उपमा दिली जाते. पाण्याची वाफ करायची असेल तर अग्नीची आवश्यकता असते. दिव्याग्नी, भूताग्नी, आकरजअग्नी, जठराग्नी, वडवाग्नी असे पंचाग्नी मानले जातात. आकाशात चमकणारी वीज म्हणजे दिव्याग्नी होय. अन्न शिजवणे इ. मानवी व्यवहारात असणारा अग्नी म्हणजे 'भूताग्नी' होय. खाणीमध्ये सापडणारे सुवर्ण हे आकरजाग्नी होय. सोने अग्नीत जळून जात नाही. अग्नी अग्नीला जाळत नसतो. म्हणून सोने हा अग्नी होय. पोटात राहणारा, अन्नपचन करणारा अग्नी हा जठराग्नी तर समुद्रातील अग्नी हा वडवाग्नी होय. वडवाग्नी जसे समुद्रातील पाणी जाळून नाहीसे करतो, त्याप्रमाणे संसाररुपी सागरातले पाणी जाळणारा अग्नी कोणता आहे? मायारुप महासागरावर ब्रह्मांडरुपी बुडबुडे उत्पन्न होत असतात आणि नाश पावत असतात. समुद्रात मोठमोठ्या मगरी असतात, त्याप्रमाणे मायासमुद्रात देखील कामक्रोधादी विकार या मगरी असतात. त्यांच्या तावडीतून सुटणे अत्यंत कठीण असते. क्रोधासाठी, कामासाठी, लोभासाठी, मोहासाठी, मदासाठी आणि मत्सरासाठी आपण आपले जीवन किती वेळा वाया घालवले याची गणती करता येणार नाही. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# कारवाईत सातत्य हवे

प्लास्टिकचा पर्यावरणाला असलेला धोका लक्षात घेऊन मुंबई महापालिकेच्या विशेष पथकांनी १ जुलै २०२२ पासून मुंबई महानगरात प्रतिबंधात्मक प्लास्टिक विरोधातील कारवाई सुरू केली होती. मधल्या काळात ही कारवाई थंडावली होती, आता पुन्हा मुंबई महानगरपालिका हद्दीत प्लास्टिक विरोधातील मोहीम तीव्र करण्यात आली आहे.





या मोहिमेत ज्या दुकानदारांवर कारवाई करण्यात येत आहे, त्यांच्याकडून मोठा दंड वसूल केला जात असल्याने दुकानदारांत नाराजीची भावना आहे. अर्थात ही दंडाची रक्कम किती असावी हा वादाचा विषय असला तरी सध्या जी कारवाई चालू आहे तिचे स्वागतच आहे. मात्र, मुंबई महानगरपालिकेला आताच प्लास्टिक विरोधात मोहीम उघडावी असे का वाटले? हा प्रश्न आहे. प्लास्टिकबंदीचा कायदा राज्यात असताना ही कारवाई का थांबवण्यात आली? दुसरी बाब म्हणजे प्लास्टिक विरोधातील कारवाई करताना छोट्या मोठ्या दुकानदारांनाच का टार्गेट करण्यात येते? कारवाई करायचीच असेल तर प्लास्टिकची निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर करावी. जर कारखान्यात प्लास्टिकची निर्मितीची झाली नाही तर दुकानदार प्लास्टिक आपल्या दुकानात ठेवणारच नाही. प्लास्टिकची निर्मितीची कारखाने माहीत असूनही महानगरपालिका त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी छोट्या मोठ्या दुकांदारांवरच कारवाई का करत आहे? याचे उत्तर महानगरपालिकेने द्यावे. प्लास्टिकचा पर्यावरणाला असणारा धोका आणि मानवी आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता, प्लास्टिक बंदीचे कोणीही समर्थनच करतील पण बंदीची अंमलबजावणी करताना छोटे दुकानदार आणि मोठे उद्योगपती असा भेदभाव करू नये शिवाय कारवाईत सातत्य हवे. महानगरपालिकेने केवळ दिखाव्यासाठी कारवाई करू नये, तसे केले तर प्लास्टिक बंदीच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जाईल.

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

# कांदा प्रश्न पुन्हा तीव्र होत आहे

आता पर्यावरण असंतुलन झाल्यामुळे लहरी पाऊसमान, पिकावर वाढती रोगराई, शेतीला लागणाऱ्या वस्तूंची व खते कीटकनाशके यांचे वाढते भाव व मोठ्या मेहनतीने पिकवलेल्या शेतमालाला जर भाव मिळाला नाही तर कठीण परिस्थिती निर्माण होते. साऱ्या मेहनतीवर पाणी पडले तर मोठे नैराश्य येते तरीही शेतकरी अन्नधान्य भाजीपाला पिकवतो. कांद्यावर निर्यात कर वाढवल्याने कांदा प्रश्न पुन्हा तीव्र होत आहे.

**- प्र. मु. काळे, नाशिक.**



# - संतविचार -

**डॉ. देविदास गुरव, सोलापूर**

# भक्तीविण फोल ज्ञान सांगे ।


**नाइकावे कानीं तयाचे ते बोल ।**
**भक्तीवीण फोल ज्ञान सांगे ।।**
**वाखाणी अद्वैत भक्तिभावेविण ।**
**दुःख पावे सीण श्रोता वक्ता ।।**
**अहं ब्रह्म म्हणोनी पाळीतसे पिंडा ।**
**नये बोलो भांडा तयासवे ।।**
**वेदबाह्य बोले तो पाषांड ।**
**त्याचे काळे तोंड संतामध्ये ।।**
**तुका म्हणे खंडी देवभक्तपण ।**
**वरिष्ठ त्याहून श्वापच तो ।।**

भक्तीविना जो वाचाळ बडबड करतो, ज्याच्या मनात भाव नसतो, भक्तीचे मर्म समजून घेण्याची इच्छा नसते, संतांनी आपल्या वाणीतून जो परमार्थ सांगितला त्याचा अभ्यास न करता व अर्थ जाणून न घेता जो व्यर्थपणे बोलतो त्याचे बोलणे कधीच कानाने ऐकू नये. मीच 'ब्रह्म' आहे असे समजून देहभावाला फार जपणाऱ्या भांडखोराशी कधीही बोलू नये. जो नास्तिक स्वत:ला सर्वापेक्षा श्रेष्ठ समजतो. तसेच देव आणि भक्त यांच्याविषयी नेहमी वेडेवाकडे बोलतो व खंडन करतो आशा व्यक्तींना संत तुकोबांनी चांगलेच फटकारले आहे. समाजात त्यावेळीही ही खल प्रवृत्ती होती.आज ती आणखी बोकाळलेली दिसून येते. भक्तीमुळे विपरीत परिस्थितीशी, दुःखाशी, संकटाशी, दोन हात करण्याचे बळ मिळते. मनोबल वाढते. मानसिक संतुलन राहते, अस्थिर व चंचल मनाला लगाम बसतो. म्हणूनच प्रापंचिक व्यवहारा बरोबरच परमार्थ, परोपकार माणसाने साधावा, असे संतांनी सुचवले आहे. संतविचारांना वैज्ञानिकतेचा स्पर्श आहे. भक्तीला ज्ञाना-विज्ञानाची जोड दिली. सक्रियतेचा स्वीकार व निष्क्रियतेचा धिक्कार केला आहे. तसेच भक्तीभावरहित ज्ञानाचे मूल्य शून्य असते. ज्ञानाला अनैतिकता चिटकली की, समाजहित साधले जात नाही. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणारेही समाजात काही कमी नाहीत. आपल्या अर्धवट ज्ञानाच्या अश्वावर आरूढ होऊन आपले 'ज्ञान' पाजळणाऱ्यांना संतांनी कठोर शब्दात सुनावले आहे. गाडी बंगला पैसा सोनं-नाणं यालाच आपण सुख म्हणत असू तर ते सुख नाशवंत आहे. दुसऱ्यांना पीडा देऊन, गैर मार्गाने सुख मिळत असेल अशा सुखाला संत तुकोबांनी लाथाडले आहे.

**आग लागो तया सुखा ।**
**जेणे हरि नये मुखा ।।**

भक्तीशिवाय ज्ञानाला महत्व नाही. ज्या ज्ञानवंतांना योग्यायोग्यतेचे 'आकलन' होत नाही, नैतिकतेचा स्पर्श नाही ते ज्ञान काय कामाचे? आज मनुष्य ज्ञानाने समृद्ध बनला. भौतिक प्रगती साधली. परंतु ज्ञानवंत असूनही अंतरंगातल्या तामसी वृत्तीमुळे वाटेल तशी दुष्कृत्ये करतो आहे.

सारासार विचार बाजूला सारून अविवेकाने वागतो आहे. अर्थात काही अपवाद सोडले तर सर्वत्र हेच चित्र दिसते आहे. संतांना समाजमन चांगलेच ज्ञात होते. दुष्ट-सुष्ट, वृत्ती-प्रवृत्तीची जाण होती. म्हणून संतांनी आपल्या वाणीतून मनोबोध केला आहे. कधी सौम्य तर कधी कठोर भाषेत त्यांनी समाजाची कान उघाडणी केली ती अतिशय योग्य होती. आजही त्यांच्या विचारांची, प्रबोधनाची, नीतीमूल्यांची तितकीच गरज आहे.



'संतवाणी' अभंग आहे. अर्थपूर्ण आहे. त्यांनी कधी भगवंताकडे स्वत:साठी सुखाची मागणी केलेली नाही किंवा सर्वसामान्यांनाही तसे करा असे सुचवलेले नाही. परंतु त्यांनी वैश्विक 'सुखाचा मार्ग' दाखवला आहे, हे नक्की.

सदाचरण, परोपकार मानवता, समता हे गुण अंगी उतरावेत म्हणून भक्तीची जोड दिली. वाचिक, कायिक आणि मानसिक शुचिर्भूतता यावी याकरिता स्वत:च्या आदर्श आचरणातून, जगण्याची नितीतत्वे रूजवण्याचा प्रयत्न केला. संतवाणी केवळ ऐकण्याचा विषय नाही. नुसते ऐकूनही सुख प्राप्त होणार नाहीच. अनुकरण, दैनंदिन शुद्ध आचरणातून ती अतंरंगात उतरली तर शाश्वत सुखाचा मार्ग सापडतो अन्यथा नाही.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## अपघात प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** अपघात प्रकरणी दोन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सागर भोसले व सागर अनिल उर्फ अण्णप्पा नाटेकर (रा.आळंद,जिल्हा गुलबर्गा,राज्य कर्नाटक) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.याप्रकरणी सोहेल इब्राहिम नदाफ (वय-२६,रा. साईनाथ नगर भाग २) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.फिर्यादी व फिर्यादी यांच्या आत्याचा मुलगा महंमद गौस राफिक नदाफ हा अमन हॉटेल मार्गे मदिना चौकाकडे दुचाकी क्र.एमएच.१३.डीके.०५२२ यावरून जात असताना विना नंबर प्लेटची चारचाकी मिक्सर गाडीचा चालक सागर नाटेकर याने वाहन चालविण्याचा परवाना नसताना व गाडीचे मालक सागर भोसले याला पूर्ण माहिती असताना देखील वाहन चालवण्यास दिले.त्यावेळी सागर नाटेकर याने जाणीवपूर्वक व अतिवेगाने त्याच्या ताब्यातील वाहन चालवून फिर्यादी यांच्या गाडीला पाठीमागून धडक देऊन फिर्यादी यांच्या आत्याचा मुलगा महंमद गौस रफिक नदाफ याच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे व फिर्यादी यांना किरकोळ जखमी करण्यास कारणीभूत ठरला आहे.अशा आशयाची फिर्याद सोहेल नदाफ यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोळुंके हे करीत आहेत.

## दुचाकीच्या धडकेत दोघेजण जखमी

**सोलापूर :** दुचाकीच्या धडकेत दोघेजण जखमी झाल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास जिल्हा परिषद शाळेसमोरील केगाव येथील ब्रिजवर घडली.फिर्यादी शुभम संतोष पवार (वय-२१,रा.अंबिका नगर,बार्शी रोड,बाळे) व त्याचा मित्र निलेश सुर्वे असे दुचाकी क्र.एमएच.१३.डीझेड.९६८२ यावरून कोंडी येथे सर्विस रोड वरून जात होते.त्यावेळी एका अज्ञात दुचाकी चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने त्याची दुचाकी चालवून फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक देऊन फिर्यादी व त्यांचा मित्र यांना जखमी होण्यास कारणीभूत ठरला आहे.याप्रकरणी शुभम पवार यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून दुचाकी क्र. एमएच.१३. डीडब्लू.४६८३ या क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक कसबे करत आहेत.

## पार्क केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर :** हँडल लॉक करून पार्क केलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीई.७२३४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.हि घटना दि.२१ ते २२ ऑगस्ट दरम्यान जुंजे बाळे येथील महापालिका गाड्यासमोर माळी गल्ली येथे घडली.याप्रकरणी दिलीप गेनू शिंदे (वय-३५,रा. गरिबी हटाव झोपडपट्टी नंबर १,विजापूर रोड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल भालशंकर हे करीत आहेत.

## चोरट्याने हातपंपाचे साहित्य पळवले

**सोलापूर :** भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नवीन आरटीओ ऑफिसच्या आवारातील व विजापूर रोड येथील दत्त मंदिराजवळ असलेला सीसीटीव्ही कॅमेरा फोडून नुकसान करून वर्कशॉप मधील हात पंपाचे जुने सुट्टे साहित्य चोरून नेण्याची घटना १५ ऑगस्ट रोजी विजापूर रोड येथे घडली.याप्रकरणी रोहन संजय कांबळे (वय-१९,रा. सुशील नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दोन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सोनार हे करीत आहेत.

# ग्रामीण भागातील अत्याधुनिक पहिले नेत्रालय होणार : आ बबनराव शिंदे


### आ. बबनदादा शिंदे नेत्रालयाचा १ सप्टेंबरला माढ्यात शुभारंभ

**सुराज्य/माढा**

माढा विधानसभा मतदारसंघातील एकही रूग्ण दृष्टीविना राहू नये यासाठी गेली पंधरा वर्षे मोफत मोतीबिंदु नेत्रचिकित्सा आणि शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करीत आहे.मात्र यासाठी येत असलेल्या वेळेच्या मर्यादा लक्षात घेता माढा येथे अत्याधुनिक असे नेत्रालय सुरू करीत आहोत. पद्मश्री डॉ तात्याराव लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील पहिले नेत्रालय होत असल्याचे आ. बबनराव शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

आपल्या वाढदिवसानिमित्त माढ्यात आयोजित कर्मयोगी आ बबनराव शिंदे नेत्रालयाच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर रूग्णालयाच्या पाहणीसाठी ते माढ्यात आले होते.यावेळी त्यांनी सांगितले की मी माझ्या वाढदिवसादिवशी कधीही थांबत नाही.मात्र सर्वसामान्य नेत्ररूग्णासाठी अत्याधुनिक अशा पध्दतीचे नेत्रालयाचे पद्मश्री डॉ तात्याराव लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभ होत असल्याने आणि हे फार मोठे पुण्याचे काम असल्याने पहिल्यांदाच वाढदिवसादिवशी उपस्थित राहत असल्याचे सांगितले.

आजपर्यंत १५ हजार हून अधिक रूग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली असून ७ हजार रूग्णांच्या मोफत नेत्रशस्त्रक्रिया केल्या आहेत. नव्याने सुरूवात होत असलेल्या या नेत्रालयात १ कोटीहून अधिक किमतीच्या अत्याधुनिक अशा मशिनरी बसवण्यात आल्या आहेत. बार्शीच्या जगदाळे मामा ट्रस्टच्या वतीने तीन वर्षासाठी मोफत सन्मती नर्सिंग होम उपलब्ध करून दिले आहे. यानंतर अत्याधुनिक अशा मोठ्या रूग्णालयाची निर्मिती माढ्यात करणार असल्याचे सांगितले. १ सप्टेंबर रोजी २०० शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार





आहेत.यानंतर अगदी माफक दरात प्रत्येक महिन्याला शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याचे आ शिंदे यांनी सांगितले.

येत्या काही वर्षात एकाही रूग्णाला डोळ्याच्या ऑपरेशनसाठी पुणे मुंबई ला जावे लागणार नाही याची दक्षता आम्ही घेणार असून आमदार बबनराव शिंदे आणि पद्मश्री डॉ तात्याराव लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच एका सुसज्ज अशा नेत्रालयाची उभारणी करणार असल्याची माहिती संकल्प फौंडेशन चे अध्यक्ष अशोकशेठ लुणावत यांनी दिली.

या शिबीराचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या हस्ते व पोलीस अधिक्षक शिरीष देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, आ. संजयमामा शिंदे, डॉ तात्याराव लहाने, डॉ रागिनी पारेख, प्रांताधिकारी प्रियांका आंबेकर, डॉ बी वाय यादव, जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, सभापती विक्रमसिंह शिंदे, डॉ सुधीर देशमुख, पंचायत समिती सदस्य धनराज शिंदे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ धनंजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले, तहसिलदार विनोद रणवरे, डॉ गणेश इंदुरकर, डॉ शिवाजी थोरात, गटविकास अधिकारो महेश सुळे आदि उपस्थित राहणार असल्याचे लुणावत यांनी यावेळी सांगितले.

**रक्तदान शिबीर**

आमदार बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मतदारसंघातून मोठे रक्तदान शिबीराचे आयोजन सुरू असून आतातपर्यत २६०० रक्तदात्यानी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले आहे. १ सप्टेंबर पर्यत माढा तालुक्यातून ५००० तर संपूर्ण मतदारसंघातून ७ हजाराचे रक्तसंकलन होण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.याचबरोबर शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

पत्रकार परिषदेस आ बबनराव शिंदे माढेश्वरी बॅंकेचे उपाध्यक्ष अशोकशेठ लुणावत संचालक गणेश काशीद राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष शहाजी चवरे जाधववाडीचे सरपंच अमोल चवरे आदि उपस्थित होते.



## रासपचा वर्धापनदिन यशस्वी करण्याचा निर्धार

**सुराज्य/सोलापूर**

राष्ट्रीय समाज पक्षाचा २० वा वर्धापद दिन २९ ऑगस्ट रोजी गणेश क्रीडा संकुल स्वारगेट पुणे येथे साजरा होत आहे. त्या अनुषंगाने नियोजनासाठी सोलापुरातील शासकीय विश्रागृहात तालुका पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख श्रीमंत हक्के व जिल्हाध्यक्ष अशोक ढोणे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

बैठकीतवर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी एकमताने चर्चा करण्यात आली.बैठकीस शहराध्यक्ष सतीश बुजुरुके, युवाध्यक्ष नागेश शिंदे, अक्कलकोट तालुकाध्यक्ष राजू बिराजदार, युवाध्यक्ष दाजी कोळेकर,शहराध्यक्ष विनोद मडिखांबे, दक्षिण तालुका युवक अध्यक्ष सोमनाथ घोडके,पंडित जानकर पाटील, शिवानंद गाडेकर , सिध्दलिंग नवले, सैपन जमादान, रमेश शिनुरे, तिपण्णा घोडके, शिवाजी हक्के,भीमा मोटे, द विधानसभा सचिव सिद्धाराम व्हनमाने,अध्यक्ष चिदानंद खट्टे,सर्पमित्र नागेश उमदी, सतिश म्हेत्रे, राजकुमार घोडके यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्रीमंत हक्के यांनी पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वर्धापनदिन यशस्वी करण्याचे आवाहन केले. आभार युवाध्यक्ष नागेश शिंदे यांनी मानले.

### म्हेत्रे यांनी दिल्या पक्षाला शुभेच्छा

वर्धापन दिनानिमित्त राज्याचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी पक्षाला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.आगामी काळात रासपला नेहमी सहकार्याची भूमिका असेल, असे आश्वासन दिले.

## सोलापूरचे सुपुत्र डॉ. अभिजित वाघचवरे बनले टफमॅन

### महाराष्ट्रात एकमेव तर देशात पाचवे

**सुराज्य/सोलापूर**

आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या आयर्नमॅन या स्पर्धेप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणाऱ्या टफमॅन स्पर्धेत सोलापूरचे सुपुत्र प्रसिध्द अस्थिविकार तज्ञ डॉ. अभिजित वाघवचवरे यांनी मोठे यश मिळवून महाराष्ट्रात प्रथम तर देशात पाचवा क्रमांक मिळवला. चंदिगढ येथे रविवार दि. २७ ऑगस्ट रोजी ही अत्यंत कठीण स्पर्धा पार पडली.

मानवी शरीर तंदरूस्त कसे आहे याची मोजमाप करण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात त्याच अनुषंगाने सर्वांत कठीण अशी स्पर्धा म्हणजे आयर्नमॅन ही आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात येते त्यामध्ये सायकलींग, स्विमिंग आणि धावणे अशा अवघ्या काही तासांच्या कालावधीत पार केल्यास त्याला आयर्नमॅन या स्पर्धेत निवड करण्यात येते. त्याच धर्तीवर भारतात राष्ट्रीय पातळीवर चंदिगढ येथे टफमॅन ही स्पर्धा घेण्यात येते त्यामध्ये १ पूर्णांक ९ किलोमिटर स्विमिंग, ९० किलोमिटर सायकलींग, आणि लगेच २१ किलोमिटर रनिंग घेण्यात येते त्यामध्ये जो यशस्वी होतो त्याला टफमॅन चा किताब देण्यात येतो. ही स्पर्धा रविवार दि. २७ ऑगस्ट रोजी चंदिगढ येथे घेण्यात आली त्यामध्ये देशातील विविध राज्यातील केवळ १५० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात सोलापूरचे सुपुत्र तथा प्रसिध्द अस्थिविकार तज्ञ डॉ. अभिजित वाघचवरे यांनीही जोरदार तयारी करून सहभाग घेतला आणि हे आवाहन त्यांनी अवघ्या सात तास वीस मिनिटांमध्ये ही स्पर्धा पूर्ण करून देशपातळीवर ५ वे तर महाराष्ट्रातील एकमेव येण्याचा मान मिळवला.





**CHANGE IN NAME**

My name is Shital Shirishkumar Gandhi, age-39, R/o, 4057, Opp. D.C.C. Bank Tuljapur Road Barshi, Tal-Barshi, Dist- Solapur, Maharashtra 413401. I have changed my name to Shital Shirish Gandhi for all future purposes.

Maharashtra Government Gazette Dated 17th August 2023 wide page no. 364. (Affidavit No. 1204, Dated.14/08/2023)










CMYK




## भोसे येथे कोयत्याने हल्ला ; सख्ख्या भावासह तिघाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : वडिलोपार्जित घरात राहायचे नाही. या कारणावरून सख्या भावाला लाथाबुक्या आणि सत्तुरने मारहाण करून जखमी करण्यात आले . ही घटना खेडभोसे (ता.पंढरपूर ) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात करकंबच्या पोलिसांनी महिलेसह तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . या संदर्भात सत्यवान भगवान पवार (वय ४८ रा .भोसे ) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांचा भाऊ भारत भगवान पवार, त्याची पत्नी मंजुषा पवार आणि मुलगा सनी पवार या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. जरवमी सत्यवान पवार हे शुक्रवारी सकाळी आंघोळ करून घरात चालले होते. त्यावेळी भारत पवार आणि त्याची पत्नी मंजुषा या दोघांनी येथे राहायचे नाही म्हणून त्यांना लाथाबुक्याने त्याने मारहाण केली. त्यावेळी सनी पवार याने त्यांच्यावर कोयत्याने हल्ला केला . अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार राजकर पुढील तपास करीत आहेत .

## हन्नुर येथे एकाच रात्री चोरट्यांनी पोस्ट ऑफिससह ५ घरे तोडले

**सोलापूर** : हन्नुर (ता.अक्कलकोट)येथे चोरट्यानी एकाच रात्री पोस्ट ऑफिस आणि ४ घराचे कुलूप तोडून चोरींचा प्रयत्न केला. त्यापैकी तिघांच्या घरातून रोख रकमेसह १८ हजाराचे दागिने गायब झाले . ही धाडसी चोरी शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली.या प्रकारामुळे ग्रामस्थात भीतीचे वातावरण पसरले आहे. यासंदर्भात बसवराज विश्वनाथ पारतनाळे (रा.लक्ष्मीचौक हन्नूर, ता. अक्कलकोट) यांनी अक्कलकोट उत्तर पोलिसात फिर्याद दाखल केली. चोरट्यानी पहाटेच्या सुमारास आपल्या घराचे कुलूप तोडून ७० ग्रॅम चांदीचे साहित्य पळविले. त्यांच्या घराशेजारी त्यांचे भाऊ विठ्ठल परतनाळे हे राहतात. यांच्या घरातून १ ग्राम सोन्याचे दागिने पळवले. त्यानंतर गावातील मडोळप्पा भरमशेट्टी यांच्या घरातून ७ हजार रुपये रोख आणि ७० ग्राम चांदीचे साहित्य पळवले. या तीन ठिकाणाच्या घरफोडीत १८ हजाराचे माल गायब झाला. तसेच गावातील मंगल बेंडके आणि गावातील पोस्ट ऑफिसचे कुलूप सोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार मोरे करीत आहेत .

## चहा पिताना पळविला मोबाईल

**सोलापूर** : चहा पीत असताना चोरट्याने मोबाईल चोरून नेल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास रेल्वे स्टेशन येथे घडली. फिर्यादी विपुल विक्रम राजबर (वय-२२,रा.खमितकर अपार्टमेंट,निराळे वस्ती) व त्यांचा भाऊ राजू राजबर याला सोडण्यासाठी रेल्वे स्टेशन येथे गेले असता फिर्यादी यांना तहान लागल्याने स्टेशन बाहेरील चहा घेऊन पाणी पीत असताना शेजारील बाकड्यावर मोबाईल ठेवला असता अज्ञात चोरट्याने तो चोरून नेला आहे.याप्रकरणी विपुल राजबर यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

## किरकोळ कारणावरून मारहाण

**सोलापूर** : किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास विजापूर नाका बेघर सोसायटी येथे घडली.फिर्यादी कुसुम दशरथ पाखरे (वय-६५,रा.विजापूर नाका बेघर सोसायटी,इंदिरानगर) यांच्या दिराचा मुलगा संतोष पाखरे हा फिर्यादीच्या घरासमोर येऊन खडूने रेषा मारत होता.त्याबाबत फिर्यादी यांनी विचारणा केली असता,तो फिर्यादीच्या मुलीचा पती बळीराम यांना हाताने मारहाण करून फिर्यादीस त्याच्या हातातील चावीने डोळ्यावर मारून जखमी केले व शिविगाळ करून घराच्या बाहेर येऊ नका अशी दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.याप्रकरणी कुसुम पाखरे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून संतोष लक्ष्मण पाखरे (वय-३०,रा.नुराणी मज्जिदच्या मागे,विजापूर रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव हे करीत आहेत.

## कळमण येथे ट्रॅक्टर पळवला

**सोलापूर** : कळमण (ता.उत्तर सोलापूर) येथे एका शेतकऱ्याच्या घरासमोरून चोरटयाने ७ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर पळविला . ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली . यासंदर्भात राजाराम शंकर पैकेकरी (वय ५५ रा.कळमण) यांनी सोलापूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांनी आपल्या घरासमोर एमएच१३-डीएम-२२२४ या क्रमांकाचा ट्रॅक्टर उभा केला होता. पहाटेच्या सुमारास चोरट्याने बनावट चावींचा वापर करून ट्रॅक्टर चोरून नेला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार डावरे पुढील तपास करीत आहेत .

## बार्शी येथे ३३ हजारांची घरफोडी

**सोलापूर** : बार्शी येथील बारूंगळे प्लॉट येथे राहणाऱ्या एका महिलेच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रकमेसह ३३ हजाराचे दागिने पळविले . ही चोरी २२ ते २६ एप्रिलच्या दरम्यान घडली.या संदर्भात स्वाती अंबादास देवडे ( रा बार्शी ) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या मंगळवारी रात्री घराला कुलूप लावून बाहेर गेल्या. होत्या दरम्यान चोरट्याने घराने कुलूप तोडून कपाटातील रोख ७ हजार रुपये,५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि गॅसटाकी असा माल चोरून नेल्याचे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . हवालदार ठेंगल पूढील तपास करीत आहेत.

## किणी येथे काठीने मारहाण

**सोलापूर** : किणीगाव (ता.अक्कलकोट ) येथे किरकोळ कारणावरून काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत लाडलेसाब गुलाब घाटे (वय ३६ रा. सुलतानपूर ता.अक्कलकोट) आणि भांडण सोडविण्यास गेलेल्या मीनाक्षी महादेव सोनकवडे (वय ३५ ) हे दोघे जखमी झाले. ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . त्यांना सिकंदर घाटे, राजेभाई शेख, सलीम शेख, अमीर शेख, नुरोद्दीन शेख आणि नौशाद शेख अशा सहा जणांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## मिरी येथे आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : मिरी (ता.मोहोळ ) येथे राहणाऱ्या भागवत अंकुश सतपल (वय ३०) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. आज रविवारी सायंकाळच्या सुमारास त्याने राहत्या घरात विष प्राशन केले होते. त्याला उपचारासाठी राजू शेख (शेजारी ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले . या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

### भीमा नदीपात्र कोरडे; पावसाने दडी मारल्याने शेतकरी हवालदिल

# आलेगाव खुर्द येथे बंधाऱ्याच्या फक्त घोषणाच

सुराज्य/टेंभुर्णी

उजनी धरणापासून दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर भीमा नदी काठालगत असणाऱ्या माढा तालुक्यातील आलेगाव खुर्द, रुई, गारअकोले, आलेगाव बुद्रुक, टाकळी (टें) इंदापूर तालुक्यातील भांडगाव, भाटनिमगाव, बावडा, गणेशवाडी गावातील भीमा नदीतील पाण्याने २५ दिवसांपासून तळ गाठल्याने नदी कोरडीठाक पडली आहे. ऐन पावसाळ्यात पावसानेही दडी मारली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांची आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची चिंता निर्माण झाल्याने 'धरण उशाला कोरड घशाला' अशी परिस्थिती झाली आहे त्यामुळे उजनी धरणातून भीमा नदीमध्ये पाणी सोडण्याची मागणी शेतकरी करीत आहे.

आलेगाव खुर्द येथे बंधाऱ्याची मागणीः आलेगाव खुर्द (ता. माढा) येथे भीमा नदीचे प्रवाह पात्र भौगोलिकदृष्ट्या



उथळ स्वरूपाचे असल्याने या ठिकाणी भीमा नदीमध्ये पाणी सोडल्यापासून १०-१५ दिवसच फक्त नदीपात्रात पाणी राहते आणि नंतर नदीपात्र संपूर्ण कोरडे पडते. गेल्या वीस वर्षांपासून या परिसरातील शेतकरी बंधाऱ्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करून बंधाऱ्याची मागणी करत आहेत. भीमा नदीवर आलेगाव खुर्द येथे बंधारा झाल्याने हजारो हेक्टर शेतीला कायमस्वरूपी पाणी मिळणार आहे.

किती वेळा करायचे निवडणुकांवर बहिष्कार, उपोषणे, जलसमाधी आंदोलने शेतकऱ्यांचा उद्विग्न सवाल ? भीमा नदीवरील आलेगाव खुर्द येथील बंधाऱ्याच्या मागणीसाठी या भागातील शेतकऱ्यांनी अनेक वेळा उपोषणे, जलसमाधी आंदोलने करत विधानसभा-लोकसभा निवडणुकांवर बहिष्कारही टाकला होता परंतु आश्वासनांशिवाय काहीही हाती लागले नाही. मात्र आजपर्यंत ठोस उपायोजना न झाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. जलसंपदा विभागाकडून भीमा नदीवर बंधारे बांधण्याचे शासनाचे धोरण नाही असे फक्त उत्तर देण्यात येत आहे.

तत्कालीन महसूलमंत्री चंद्रकांत पाटील आणि आताचे खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनीही शब्द पाळला नाही: बंधाऱ्याचा प्रश्न मार्गी न लागल्याने २०१९ साली कोंढार भागातील ग्रामपंचायतींनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे जाहीर केले होते. मात्र तत्कालीन महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी भिमानगर येथे शेतकऱ्यांची बैठक घेऊन विधानसभा निवडणुकीपूर्वी बंधाऱ्याचा प्रश्न मार्गी लावू असा शब्द दिला होता. माढा लोकसभा निवडणुकीनंतर भिमानगर येथे झालेल्या बैठकीमध्ये खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी आलेगाव खुर्द येथील बंधाऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन देऊनही मात्र अद्याप काहीही झाले नाही..

प्रत्येक वर्षी पावसाळ्याच्या तोंडावर जुलै महिन्यात टणू-टाकळी (टें), रुई याप्रमाणे भीमा व नीरा नदीवरील सर्वच बंधाऱ्यांची दारे काढण्यात येतात. परंतु पाऊस कमी झाल्याने बंधारे असूनही बंधारे न धरल्यामुळे शेतकऱ्यांना ऐन पावसाळ्यात भीषण पाणी घेऊन जायचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे उजनी धरण ५० टक्के होईपर्यंत बंधारे पूर्ण क्षमतेने धरण्यात यावेत. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

> पाऊसही नाही आणि नदीमध्ये पाणीही नाही त्यामुळे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पिके जळू लागली आहेत, आलेगाव खुर्द येथे बंधारा होणे गरजेचे आहे बंधारा झाल्यास कोंढार भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. प्रत्येक वर्षी हातात तोंडाशी आलेली पिके पाण्याविना जळतात त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून शासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
>
> **– हरीभाऊ माने, शेतकरी आलेगाव खुर्द**

## विवाहित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**सोलापूर** : आसरा चौक परिसरातील पाटील नगरात राहणाऱ्या एका २७ वर्षीय विवाहित तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आज रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. शहबाज जावीद शेख (वय २७ रा.पाटील नगर,आसरा चौक) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घराचा दरवाजा आतून बंद करून घेतला. आणि छताच्या लोखंडी अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून त्वरीत शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत शहबाज शेख याच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. तो पान दुकानात कामाला होता. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## आलेगाव खुर्द येथील शिबिरात पित्यासह सख्ख्या बहिणींचे रक्तदान

सुराज्य/टेंभुर्णी

: आमदार बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आलेगाव खुर्द (ता. माढा) येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थांनी रक्तदान शिबिर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, वृक्षारोपण, स्वयंसेवक महिलांचा सन्मान कार्यक्रम घेण्यात आला. कुर्डुवाडी पंचायत समितीचे सभापती विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. महिलांनीही रक्तदानामध्ये सहभाग घेतला. रक्तदात्यांना प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. शिक्षकांच्या तुटवड्यामुळे सहा महिन्यांपासून जिल्हा परिषद शाळेसाठी स्वयंसेवक म्हणून काम करणाऱ्या शुभांगी गायकवाड यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

यावेळी जिल्हा दूध संघाचे माजी संचालक शिवाजीराव पाटील, माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संजय पाटील, उपसभापती धनाजी जवळगे, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना संचालक औदुंबर घाडगे, सचिन देशमुख, तात्यासाहेब झिंजे, चित्राताई वाघ, जितेंद्र गायकवाड, काकासाहेब पाटील, माढेश्वरी अर्बन बँक संचालक राजेंद्र पाटील, माजी सरपंच प्रदीप गायकवाड, अमोल देवकाते, उद्धव केचे, दत्ता माने, शुभांगी गायकवाड, महावीर गायकवाड, आदेश आवारे उपस्थित होते.






> पहिल्यांदाच रक्तदान केल्याने आनंद वाटला. वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर हा स्तुत्य उपक्रम आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान म्हणून प्रचार आणि प्रसार जरी होत असला तरी मुळात रक्तदात्यांची संख्या ही खूप कमी आहे. एकाच्या रक्तदानातून दोन ते तीन रुग्णांचा जीव वाचवू शकतो. रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून रक्तदात्यांची संख्या वाढेल.
>
> **– कु. आरती गायकवाड, रक्तदात्या**

**पित्यासह सख्ख्या बहिणींचे रक्तदान**

माजी सरपंच प्रदीप गायकवाड यांच्यासह त्याच्या मुली कोमल गायकवाड व आरती गायकवाड या दोघी सख्ख्या बहिणींनी रक्तदान करून रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण करून समाजासाठी आदर्श घालून दिला.



## शरद पवार गट : राष्ट्रवादीच्या शहर युवक अध्यक्षपदी वाकसे कार्याध्यक्षपदी शेख

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या शहर युवक अध्यक्षपदी माजी महापौर महेश कोठे समर्थक अक्षय वाकसे यांची निवड करण्यात आली असून कार्याध्यक्षपदी सर्फराज शेख यांची वर्णी लावण्यात आली आहे.

रविवारी, माजी महापौर नलिनी चंदेले यांच्या निवासस्थानी पक्ष निरीक्षक शेखर माने यांच्या उपस्थितीत झालेल्या पक्षाच्या ज्येष्ठ नेते मंडळींच्या बैठकीत युवक अध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्या पाचजणांच्या नावावर मंथन झाले. त्यानंतर रात्री उशिरा शासकीय विश्रामगृहात निरीक्षक माने यांनी निवडीची घोषणा केली. घोषणा होताच वाकसे व शेख समर्थकांनी जल्लोष केला.

माजी महापौर चंदेले यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष भारत जाधव, ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, माजी महापौर ॲड. यू. एन. बेरिया, मनोहर सपाटे, महेश कोठे, माजी शहराध्यक्ष महेश गादेकर, माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड, तौफिक शेख ही नेतेमंडळी उपस्थित होती.

युवक अध्यक्षपदासाठी अक्षय वाकसे यांच्याबरोबरच आमदार रोहित पवार समर्थक नजीब शेख, निशांत साळवे, सर्फराज शेख, मुसा अत्तार हे इच्छुक होते. अखेर यातील वाकसे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड झाल्यानंतर पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व सत्तेत सहभागी होऊन उपमुख्यमंत्री झालेले अजितदादा पवार असे दोन गट पडले आहेत. यात पूर्वीचे युवक अध्यक्ष जुबेर बागवान हे अजितदादा गटात गेल्याने शरद पवार गटाच्या युवक अध्यक्षपदाची नव्याने निवड करण्यात आली.

## रोजगार मागणाऱ्या कुटुंबांना जॉब कार्डच मिळेना

सुराज्य/पिलीव

केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार कुटुंबातील व्यक्तींना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगार उपलब्ध करुन देते.सदरचा रोजगार मिळविण्यासाठी सदरच्या कुटुंबाने रितसर नोंदणी केलेली पाहीजे .नोंदणी केल्यावर सदरच्या कुटुंबाला कुटुंब ओळखपत्र किंवा जॉब कार्ड दिले जाते.त्यानंतर त्याच जॉब कार्ड च्या सहाय्याने रोजगार हमी मधील सर्व कामे यामध्ये वेगवेगळ्या फळबाग किंवा इतर लागवडी तसेच पंतप्रधान आवास योजना असो कि इतर अनेक शासकीय योजनांसाठी सदरचे जॉबकार्ड अत्यंत उपयोगी पडते.महात्मा गांधी रोजगार हमीच्या सर्व योजनांसाठी ,बांधावरील किंवा सलग फळबाग लागवड यासाठी सदरचे कार्ड आवश्यक आहे. परंतु माळशिरस तालुक्यात सदरचे जॉबकार्ड गेली पाच - सहा वर्षापासून उपलब्धच नाहीत. प्रत्येक गावातील ग्रामरोजगार सेवक पंचायत समितीतील रोजगार हमी विभागाकडे सदरच्या जॉब कार्डची मागणी करीत आहे.

पण अद्यापही माळशिरस तालुक्यात सदरची जॉब कार्डच उपलब्ध नसल्याने शेतकरी व इतर काम करणाऱ्या कामगार मोठ्या अडचणींचा सामना गेल्या अनेक वर्षापासून करावा लागत आहे. तर सदरची जॉब कार्ड ही शासन स्तरावरुन उपलब्ध होतात ती पंचायत समितीला तयार करण्याचा अधिकार नाही .यामुळे मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन माळशिरस तालुक्यात तात्काळ जॉब कार्ड उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.



## तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत अनंत चैतन्यच्या मुलींचा संघ प्रथम

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोटच्या फत्तेसिंह ग्राऊंडवर झालेल्या १७ वयोगट कबड्डी या मैदानी सांघिक खेळात महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूरच्या मुलींच्या संघाने तीन संघांना हरवून चौथ्या संघाबरोबर झालेल्या चुरशीच्या सामन्यात प्रथम क्रमांक पटकावला.

अगोदर ही कु.काजल चव्हाण हिने गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविले आहे व या सर्वांची जिल्हास्तरीय क्रीडास्पर्धेसाठी निवड झाली आहे.तर १४ वयोगट खो-खो मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. या सर्व खेळाडूंचे तसेच मार्गदर्शक क्रीडा शिक्षक श्री. शहाजी माने, श्री.सरदार मत्तेखाने व क्रीडा सहाय्यक श्री. स्वामीनाथ कोरे यांचे प्रशालेचे माजी प्राचार्य, मार्गदर्शक व आधारवड असलेले श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले तर हन्नूरचे उपसरपंच, धडाडीचे व दिलदार मनाचे युवा नेते मा.सागरदादा कल्याणशेट्टी यांनी सांघिक खेळातील प्रत्येक खेळाडू मुलां-मुलींना रूपये ५०१ चे रोख बक्षीस तर गोळाफेक मधील कु. काजल चव्हाण हीस रू. ३००१ चे रोख पारितोषिक देऊन कौतुक केले.या प्रशालेच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे ज्येष्ठ संचालक आदरणीय मल्लिनाथ कल्याणशेट्टी , मल्लिकार्जून मसूती, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, संस्थेच्या सीईओ रुपाली शहा ,विज्ञान विभागाच्या प्रमुख सौ.पुनम कोकळगी मॅडम यांनी सर्व खेळाडू व मार्गदर्शक क्रीडाशिक्षक -सहाय्यक यांची प्रशंसा करून पुढील जिल्हास्तर स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याध्यापक विलास बिराजदार, पर्यवेक्षक अशोक साखरे व समस्त शिक्षक बंधु-भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी -विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पंढरपूर तालुक्यात तीन दूध डेअऱ्यांवर छापे

### दूध भेसळखोरीला लगाम लावण्यासाठी प्रशासनाची करडी नजर

सुराज्य/सोलापूर

राज्यात दुध भेसळखोरीने उच्छाद मांडला असून दुध उत्पादनापेक्षा विक्री अधिक होत असल्याने याची गंभीर दखल घेऊन दुधाची तपासणी करण्यासाठी जिल्हास्तरीय पथके स्थापन करण्यात आली असून या पथकाने पंढरपूर तालुक्यातील वाखरी व भंडीशेगाव येथील दुध संकलन करणाऱ्या केंद्रावर अचानक छापे मारुन दुधाचे नमुने तपासणी साठी घेतले यामुळे डेअरी चालकात खळबळ उडाली असून त्यांचे धाबे दणाणले आहे.

दुधात होणाऱ्या भेसळीविरुद्ध कारवाई करण्यासाठी जिल्हावार धडक मोहिम राबविण्याचे निर्देश दुग्धव्यवसाय विकास विभागाचे सचिव तुकाराम मुंडे यांनी दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात दुध तपासणीची धडक मोहीम सुरु करण्यात आली आहे. तसेच दुधात भेसळ करणाऱ्यांविरोधात दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई देखील केली जात आहे. त्यामुळे, सर्व दुध विक्रेते, दुध व दुग्धजन्य पदार्थ, उत्पादक यांनी उच्च गुणप्रतीच्या दुध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

त्यानुसार जिल्ह्यातील पथकाने पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथील पांडुरंग व व्हिआरएस डेअरी व भंडीशेगाव येथील पंढरपूर मिल्क प्रोडक्ट डेअरी मधील दुधाची तपासणी करून दुध तपासणी साठी घेतले.हे दुध पुणे येथील प्रयोगशाळेकत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. या पथकात जिल्हा दुध व्यवसाय विकास अधिकारी डॉ. मिनाक्षी जगताप,विश्वेश्वर पाटील,अन्न प्रशासन विभागाचे उमेश भुसे,केमिस्ट नागेश मगर,पोलीस अधिकारी नरेंद्र गायकवाड यांचा समावेश होता. जिल्हा हा भेसळयुक्त दुधाचे केंद्र बनले असल्याने सचिव तुकाराम मुंडे यांनी जिल्ह्याकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

**डिग्री वाढवण्यासाठी धोकेदायक भेसळ.**

सर्वसामान्यांचा समज असा आहे की, दुधात केवळ पाण्याची भेसळ होते; मात्र दुधात पाणी टाकल्यानंतर डिग्री वा प्रतवारी कायम ठेवण्यासाठी त्यात धोकेदायक रसायनांची भेसळ केली जाते. दुग्धविकास विभागाच्या सूत्रांच्या माहितीनुसार युरिया, माल्टोज, साखर, मीठ, तेल यापासून क्रूड ऑईलपर्यंत अनेक पदार्थ भेसळीसाठी वापरले जात असल्याची धक्कादायक माहिती मिळाली. इंधन भेसळीपेक्षाही दूध भेसळीचे परिणाम गंभीर असून आरोग्यावरच विपरित परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# जोर-बैठका सुरु आहेत !

कुठल्याची पैलवानाला कुस्तीचा आखाडा जिंकण्यासाठी दूरदृष्टी व ध्येय ठेवून अगोदरपासूनच तालमीत जाऊन आपल्या वस्तादाच्या मार्गदर्शनाखाली तालीम करणे क्रमप्राप्त आहे. अंग मेहनतच्या विविध कसरती करीत जोरावर जोर आणि बैठकावर बैठका काढल्याशिवाय पैलवान तावूनसुलाखून निघाल्यानंतरच तो मैदानात समोरच्या पैलवानाला चित करण्यासाठी उतरतो. हा झाला तालमीतल्या खऱ्याखुऱ्या पैलवानाच्या बाबतीतला भाग. पण हाच प्रकार जर राजकारणात घडला तर...! तसं मेहनतीची तालीम आणि राजकीय तालीम यात जमीन अस्मानाचा फरक. अंगात रग नसतानाही लुकडा-तुकडा राजकारणातला गडी अर्थबळाच्या जोरावर दंड थोपटून राजकीय मैदानात... रिंगणात... आखाड्यात उतरण्याची भाषा करतानाचे प्रकार आपण नेहमीच पाहतो. आव्हाने प्रतिआवाहने देत ही राजकीय मंडळी अंगात दम आणि रग नसतानाही न झेपता येणाऱ्या डरकाळ्या फोडताना दिसतात. अलिकडील काळात सोलापूर शहर-जिल्ह्यात असेच काहीसे प्रकार सुरु आहेत.




शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो. ९५१८७७३०४८

## शिंदेंचा पट्टशिष्य आता दक्षिणकडे...

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे लाल मातीतल्या तालमीपेक्षा राजकारणातल्या तालमीत 'पांढरेशुभ्र' झालेले व्यक्तिमत्व. त्यांच्या याच राजकीय तालमीत निष्ठा ठेवून सतत सोबत राहणारे शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे हे चांगलेच चर्चेत असतात. शिंदे यांनी जशी काँग्रेसनिष्ठा सोडली नाही तशी नरोटे यांनी स्थानिक पातळीवर उलथापालथी झालेल्या असतानाही 'शिंदेनिष्ठा' कधी सोडली नाही. म्हणूनच की काय आता त्यांना विधानसभा खुणावत आहे. त्यांनी सोलापूर दक्षिण तालुका मतदारसंघावर डोळा ठेवल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. आता शिंदेंच्या दक्षिण तालुक्यातील तालमीत याअगोदरच बाबा मिस्त्री आणि सुरेश हसापुरे हे दोन मल्ल अंगावर माती लावून तयार आहेत. त्यात आता चेतन नरोटेही लंगोटं बांधून तयार झाले आहेत. त्यांच्या अंगाला अजून दक्षिणची लाल माती लागणे बाकी आहे.

## महादेव जानकरांच्या डरकाळ्या हवेतच

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर हे अलिकडील काळात तालमीतील सरावाला जागा सापडत नसल्याने ते सध्या तिथे जातात तिथे डरकाळ्या फोडत आहेत. रासप हा भाजपाचा मित्रपक्ष आहे. कधी ते भाजपाशी जवळीक साधतात तर कधी आपल्या हिताचे काहीच पदरात न पडल्यास भाजपापासून फारकत घेत असल्याची भाषा करतात. परवा अक्कलकोट दौऱ्यात तर त्यांनी आगामी निवडणुका रासप स्वबळावर लढण्याची घोषणा करुन वेगळी चूल मांडली आहे. पण या चुलीत निखारा कोण टाकणार?, हा खरा प्रश्न आहे. तसं रासपने कुठल्याच जिल्ह्यात अपेक्षेप्रमाणे मूळ रोवले नाही. जानकर जिथे जातात त्यावेळी तेवढ्यापुरते 'विशिष्ट' लोक त्यांच्याभोवती गोळा होता. नंतर पुन्हा पांगापांगी. रासपमध्ये हा खेळ सुरुवातीपासूनच सुरु आहे. रासपद्वारे स्वत:भोवती वलय निर्माण करण्यापलिकडे जानकर यांनी कार्यकर्त्यांचे जाळेच विणले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

## शिर्डी तर हवेच पण सोलापूरही द्या !

परवा रिपाइंचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले. पंढरीत त्यांनी बोलताना लोकसभा निवडणुकीवर भाष्य केले. शिर्डी येथे एकदा पराभवाचा झटका बसलेला असताना साईबाबाचरणी नतमस्तक होत त्यांनी येणाऱ्या लोकसभेसाठी स्वत:साठी शिर्डी लोकसभेवर दावा केला आहे. पण आता सोलापूर लोकसभेवरही त्यांनी दावा केला आहे. तशी महायुतीत सोलापूरची जागा भाजपाच्या वाट्याला आहे. भाजपाने आपल्या उमेदवाराचा पत्ता ओपन न केला नसला तर भाजपाकडे चार ते पाच जण नव्या दमाचे खिलाडी रांग लावून आहेत. त्यांचा पैलवानकीचा खुराक अर्थात राजकीय पेरणी गेल्या वर्षभरापासून सुरु आहे. अशा स्थितीत तालमीत उतरण्या आधीच आठवले यांनी केलेला दावा कितपत यशस्वी ठरणार, हे पहावे लागणार आहे. त्यां सोलापुरात आपला एक 'मोहरा' शोधून ठेवला आहे.

## रमेश कदम पुन्हा मोहोळच्या उंबरठ्यावर...

मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. रमेश कदम हे आक्रमक आणि बेताल बोलण्यासाठी प्रसिध्द असे व्यक्तिमत्व. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील कथित गैरव्यवहारामुळे ते गोतात आले. त्यांना तुरुंगात जाण्याची पाळीही आली. आता ते जामीनवर सुटले आहेत. आता ते आपल्या पूर्वाश्रमीच्या मोहोळ विधानसभा मतदारसंघाच्या उंबरठ्यावर आहेत. तुरुंगात असताना त्यांनी राजकीय अभ्यासाबरोबरच चांगल्या जोर-बैठका केल्या आहेत. कदम हे मागे हटणारे व्यक्तिमत्व नसल्याने मोहोळच्या आखाड्यात उतरणार, हे मात्र निश्चित मानले जात आहे. यामुळे मोहोळचे आमदार यशभाऊंच्या तालमीवर परिणाम झाला आहे. असे असले तरी मोहोळचे वस्ताद असलेले माजी आ. राजन पाटील यांच्यावर बरेच काही अवलंबून आहे. ते कुठल्या पठ्ठ्याला पसंत करणार यावर मोहोळचे गणित ठरणार आहे.

# निवडणुकांच्या तोंडावर बार्शीचा राजकीय संघर्ष विकोपाला

*राज्यात शरद पवार आणि त्यांना उत्तर देणाऱ्या अजित पवार यांच्या सभा आणि शिंदे, फडणवीस यांचे दौरे गाजत आहेत. उध्दव ठाकरे यांनी लोकसभा मतदार संघामध्ये आढावा बैठका आणि सभा यातून आपल्या गटाचे पुर्नरूजीवन करण्याचा चंग बांधला आहे. अशा परिस्थितीमध्ये या सर्व प्रमुख राजकीय पक्ष आणि नेते यांचे कट्टर समर्थक असलेल्या बार्शी विधानसभा मतदार संघामध्येही भुमीगत राजकारणाला वेग आला आहे.*

**सचिन अपसिंगकर**







सध्या माजी मंत्री दिलीप सोपल हे ठाकरे गटात आहेत. १९८० सालापासून पवारांची आणि नंतर त्यांच्या पुतण्याची पाठराखण करत राजकारण करणाऱ्या सोपल यांनी २०१९ साली शिवसेनेत प्रवेश केला. मात्र या प्रवेशानंतरही सोपल शरीराने शिवसेनेत आणि मनाने राष्ट्रवादीत असल्याचे चर्चा झडायची. शिवसेना आणि राष्ट्रवादीत झालेल्या फुटीनंतर सोपल यांनी वॅट ॲण्ड वॉचची भुमिका स्विकारली आहे. सध्याच्या अजित पवार यांच्या भाजपाशी झालेल्या जवळकीनंतर त्यांना शरद पवार गटात घरोबा अधिक सोईचा आहे. पण स्थानिक निवडणूका जाहिर झाल्याशिवाय सोपल कोणतीही उघड भूमिका घेतील असे वाटत नाही.

आमदार राजाभाऊ राऊत हे सध्या तालुक्यातील बहुचर्चीत नेतृत्व आहे. त्यांच्या हातामध्येच तालुक्याची सत्ता एकवटली आहे. राऊत यांनी २०१७ साली भाजपात प्रवेश करून फडणवीस यांचा विश्वास संपादन करत राजकीय निर्णय घेतले. गेल्या वर्षभरात आ. राजेंद्र राऊत यांनी पाठपुरावा करत फडणवीस यांच्या माध्यमातून तालुक्याला मोठा विकासनिधी मिळवला आहे. राऊत अतिशय सक्रिय असून सध्याच्या राजकीय सत्तेचा फडणवीस यांच्या माध्यमातून तालुक्याला लाभ मिळवून देत आपला राजकीय पाया ते भक्कम करत आहेत. भविष्यातल्या निवडणूका भाजपाच्याच माध्यमातून हे त्यांनी जाहिरपणे सांगितले आहे.

२०१४ साली बार्शीच्या राजकारणात प्रवेश केलेल्या राजेंद्र मिरगणे यांनी भाजपाचे प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी अशी प्रतिमा निर्माण करत महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे कॅबीनेट मंत्री दर्जा सहअध्यक्षपद मिळवले. त्यांनी बार्शीत भाजपाचे पक्ष कार्य मोठ्या निष्ठेने केले. राऊत यांच्या भाजपा प्रवेशानंतर मिरगणे यांनी अलिप्ततावाद स्विकारला आहे. अधुन मधुन ते समाजकारणात सक्रिय होत असले तरी राजकारणाबाबत ते उदासिन असल्याचे चित्र आहे.

माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले व त्यांचे माजी उपनगराध्यक्ष पुत्र कृष्णराज बारबोले यांनी दोन वर्षापुर्वी राष्ट्रवादीकडे झुकण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अकरा वर्षे राऊतांबरोबर असलेले राजकीय संबंध तोडले. नुकतेच त्यांनी राष्ट्रवादी फुटीच्या पार्श्वभुमीवर शरद पवार यांच्या मागे राहण्याचा निर्णय घेतला आहे. बारबोले यांना आगामी राजकारणात आजपर्यंत निर्माण केलेला संर्पकाचा अनुशेष भरून काढून संघटनात्मक ताकद वाढविण्याचे आव्हान आहे.

आगामी निवडणूका ते स्थानिक पातळीवर मविआ फॅक्टर वापरत सोपल गटांशी हातमिळवणी करून लढवतील असे मानले जाते.

माजी पोलीस अधिकारी आणि बारा वर्षे शिवसेनेचा भगवा ताकदीने पेलणाऱ्या निष्ठावंत भाऊसाहेब आंधळकरांना सातत्याने समाजकारण करून आणि वादळी पवित्रे घेत आणि तडाखेबाज भाषणे करूनही राजकीय सुर मात्र गवसलेला नाही. आंधळकर यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला त्यांनतर त्यांनी विजय शिवतारे यांना बोलावून मेळावा घेतला. मात्र अद्यापही बार्शीत शिंदे गटाचे अस्तित्व जाणवेल अशी संघटनात्मक मोर्चेबांधणी करून त्यांना ताकद वाढवण्याचे आव्हान आहे. बार्शीमध्ये काँग्रेस शहराध्यक्ष विजय साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली सक्रिय आहे. बार्शीच्या काँग्रेसच्या नव्योन जम बसविण्यासाठी माजी शहराध्यक्ष जीवनदत्त आरगडे यांचे प्रयत्न सुरू आहेत. गटबाजी संपली तरच बार्शीत काँग्रेसचे कार्य जाणवनार आणि वाढणार आहे.

आगामी घडामोडींकडे आणि पक्ष बदलांकडे लक्ष

केवळ सहा महिन्यावर लोकसभेच्या आणि चौदा महिन्यांवर विधानसभेच्या निवडणूका येवून ठेपल्या आहेत. राज्यात गेल्या वर्षभरात झालेल्या राजकीय घडामोडीमुळे वातावरण ढवळून निघाले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांमध्ये झालेल्या मोठ्या बंड आणि फुटीचे पडसाद राज्याच्या राजकारणावर उमटले आहेत. प्रत्येक विधानसभा मतदार संघावर या राजकीय बदलांचे सावट पडल्यामुळे समीकरणे बदलली आहेत. एकंदरीत निवडणूकांच्या तोंडावर बार्शीचा राजकीय संघर्ष विकोपाला गेला आहे. त्यामुळे आगामी घडामोडींकडे आणि पक्ष बदलांकडे तालुक्याचे लक्ष आहे.

# भावी खासदार म्हणून झळकले बॅनर पोस्टरबाजीमुळे चर्चेला उधाण

*शहर मध्यच्या काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांचे भावी खासदार म्हणून काँग्रेस भवन येथे बॅनर लागले आहेत. त्यामुळेच आ. प्रणिती शिंदेंच आगामी काळात सोलापूर लोकसभेच्या उमेदवार असतील, अशी चर्चा आता जोरदारपणे सुरू झाली आहे. काँग्रेसचे सोलापूर शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी काँग्रेस भवन बाहेरच हे बॅनर लावले आहे.*

**अजित उंब्रजकर**

सोलापूरच्या आमदार प्रणिती शिंदे यांची नुकताच अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय कार्यकरिणीत विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाली आहे. त्यासाठी शुभेच्छा देण्यासाठीच्या बॅनरवर शहराध्यक्षांनी प्रणिती शिंदे यांचा 'भावी खासदार' असा उल्लेख केला आहे.

सलग दोनवेळा पराभव झाल्याने माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे सोलापूर लोकसभा प्रणिती शिंदे यांनी लढवावी, असा प्रस्तावही शहर काँग्रेसने प्रदेश कमिटीकडे पाठवला आहे. कार्यकर्त्यांकडून प्रणिती शिंदे या मैदानात उठराव्यात यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यातूनच हे बॅनर लावले गेले आहे. सलग दोनवेळा भाजपाने हा मतदारसंघ जिंकला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस भाजपबरोबर सत्तेत गेल्याने भाजपाची ताकद आणखी वाढली आहे. त्यामुळे आता प्रणिती शिंदे काय भूमिका घेतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आ. प्रणिती शिंदे नाराज

आ. प्रणिती शिंदे यांचे बॅनर भावी खासदार म्हणून काँग्रेस भवनात शहराध्यक्ष नरोटे यांनी लावले आहे. मात्र यावर आ. प्रणिती शिंदे या नाराज झाल्याची माहिती आहे. मध्यंतरीही आ. शिंदे यांना लोकसभा निवडूक लढवणार का, तसा ठराव प्रदेशकडे पाठवला आहे, असा प्रश्न विचारल्यावर आ. शिंदे यांनी अजून कोणताही निर्णय झाला नसल्याचे सांगितले होते.




# राज्यातील सत्तांतरमुळे आ. आवताडेंची मतदारसंघावर मजबूत पकड

*महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर भाजप आणि एकनाथ शिंदे गटाने राज्यात युतीचे सरकार निर्माण केले आहे. तेव्हापासून पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात अनेक विकास कामांना चालना मिळाली आहे. मंगळवेढ्याचा पाणी प्रश्न अंतिम टप्प्यात आला आहे. तसेच पंढरपुरात एमआयडीसी देखील मंजूर होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे राज्यातील सत्तांतर हे आमदार अवताडे यांच्यासाठी लाभदायी ठरले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडून अजित पवार यांचा मोठा गट हा सरकार मध्ये सामील झाला आहे. त्यामुळे देखील पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघावर अवताडे यांची पकड मजबूत झाली आहे.*

**सूरज सरवदे**



राज्यातील सत्ता परिवर्तनाचा फायदा पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार समाधान अवताडे यांना होताना दिसतोय. आमदार आवताडे यांच्या पाठीमागे परिचारक, शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि अजित पावर गट ताकद उभी राहिली आहे. विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांत परिचारक हे देखील भाजपचे काम करत आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला मानणारा मतदारसंघ आहे. त्यामुळे अजित पवार यांच्यासोबत गेलेल्या पदाधिकाऱ्यांमुळे आ.आवताडे यांचे पारडे जड करणारे आहे.

विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांत परिचारक हे देखील पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी इच्छुक आहेत. त्यांच्याकडे ७० - ८० हजार मतांचा गठ्ठा आहे. परिचारक यांच्याकडे असणारा मतांचा गठ्ठा पोट निवडणुकीत आमदार समाधान आवताडे यांच्या पाठीमागे वळवला होता. त्यामुळे विधानसभेच्या पोटनिवडणुकीत अवताडे यांना पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात पहिल्यांदाच कमळ फुलवण्यात यश आले होते.

मंगळवेढा उपसा सिंचन योजनेचा प्रश्न अंतिम टप्प्यात असून वर्षानुवर्षे रखडलेला पाणी प्रश्न आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांमुळे योजनेला यश येताना दिसत आहे. तसेच पंढरपूर तालुक्यामध्ये युवकांना रोजगार निर्मिती करता यावी यासाठी अनेक वर्षापासून रखडलेल्या एमआयडीसीचा प्रश्न हा देखील अंतिम टप्प्यात आला आहे. येणाऱ्या काही दिवसातच एमआयडीसीला मंजुरी मिळणार आहे. त्यामुळे आमदार समाधान आवताडे यांच्यासोबत येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत परिचारक गट, शिंदे गट, अजित पवार गट असो वा नसो अवताडे यांची पकड मजबूत झाली आहे.

## पुनश्च हरि ओम...

# 'हत्ती' उठणार आणि पळणार!

*आंबेडकरी चळवळीत सोलापूरचे मोठे योगदान आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सोलापूर जिल्हा म्हणजे, जीव की प्राण असायचे. त्यानुसार दलित पँथर ते रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यापर्यंत सोलापूरच्या आंबेकरप्रेमी कार्यकर्त्यांनी या चळवळीला पाठबळ दिले आहे. या चळवळीच्या मशालीतील ज्योत सदैव तेवत ठेवली आहे. ती आजही प्रज्वलित असल्याचे पहायला मिळते पण दिवा प्रकाशमान असला तरी या चळवळीतील नेते आणि कार्यकर्त्यांची दिशा भरकटली गेली आहे. ही खंत जुन्या पिढीतील लोकांकडून व्यक्त केली जातेय. कारण ही चळवळच राजकीय पक्षांच्या दावणीला बांधली गेली आहे. वैचारिक मतभेद झाल्यानंतर रिपब्लिकन पक्ष नेत्यांच्याच विविध गटांमध्ये विखुरला गेला. आंबेडकरी चळवळीत बहुजन समाज पक्षाचाही चेहरा पहायला मिळतो. या पक्षाचे संस्थापक कांशीराम यांनी डॉ.आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून १४ एप्रिल १९८४ला पक्षाची स्थापना केल्यानंतर त्याच दिवशी सोलापुरात या पक्षाचा झेंडा रोवला गेला.*

**पुरुषोत्तम कुलकर्णी**

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते राहुल सरवदे यांनी सोलापुरात या पक्षाची पायाभरणी केली. तेव्हापासून आजपर्यंत या पक्षाचे अस्तित्व सोलापुरात पहायला मिळते. या पक्षातील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी स्वतःहून आपला पक्ष अन्य राजकीय पक्षाच्या दावणीला बांधला नाही. निवडणुकांमध्ये यश मिळो वा न मिळो. लढाई म्हणजे लढाई. 'हरलो पण लढलो',अशी ताकत या पक्षातील कार्यकर्त्यांनी दाखवून दिली आहे. सोलापूर महापालिकेत एका टर्ममध्ये या पक्षाचे तीन नगरसेवक दणक्यात निवडून आल्यानंतर सोलापूरच्या राजकीय क्षेत्रात खळबळ माजलेली होती. त्याच दरम्यान यूपीत सोशल इंजिनियरिंगचा प्रयोग सक्सेस करून मायावती यांनी त्या राज्याची सत्ता एकहाती ताब्यात घेतली होती. सोलापुरात निवडून आलेल्या नगरसेवकांनी सोलापुरातही हा प्रयोग यशस्वी करण्याचा निर्धार केला पण तो हवेतच राहिला. पुढे कोई गिरा,कोई इधर-उधर गया,अशी या पक्षाची अवस्था झाली. २०२२ मधील यूपीतही या पक्षाची जबरदस्त पडझड झाली. त्यामुळे पक्षात एकप्रकारचे नैराश्य पसरले.

आता मात्र पक्षाची बॅटरी पुन्हा चार्ज झाली आहे. गेल्या आठवड्यातील बुधवारी लखनौमध्ये या पक्षाची बैठक झाली. आगामी लोकसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला तसेच नेत्यांना देशात पुन्हा पक्ष संघटन वाढवण्याची सूचनाही केली. त्यानुसार पक्षाचे सोलापूरचे प्रभारी मनीष गौतम हे सोलापूरला येवून गेले. त्यांनी पक्षाची बैठक घेवून कार्यकर्त्यांना प्रबोधन करत पुन्हा ॲक्टीव्ह होण्याचे आवाहन केले. लोकसभा लढवण्याबरोबरच शोलापूर में महापौर बनाओ हा नारा या बैठकीत दिला गेला. या पक्षाची आगामी रणनीतीही गौतम यांनी कार्यकर्त्यांना सांगितली. कार्यकर्त्यांनी मूठ आवळून मायावतींना पुन्हा ताकत देण्याची प्रतिज्ञा या बैठकीत केली.

या पक्षाचे चिन्ह हत्ती आहे. हत्ती कधीच बसत नाही, असे म्हटले जाते. यदाकदा बसला की तो लवकर उठत नाही, असे प्राणीशास्त्र सांगते. यूपीत या पक्षाची वाताहत झाल्यानंतर हत्ती बसला. तो आता उठून उभा राहाण्याची शाश्वती नाही,असा राजकीय जाणकारांचा अनुमान होता परंतु मायावतींचा निर्धार पाहता बसलेला हत्ती पुन्हा उठला, असे म्हणायला काहीच हरकत नाही. नुसताच उठणार नाही तर तो आता पळायलाही लागेल.

पक्षाचा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून राहुल सरवदे यांची विशेष प्रशंसा करावी लागेल. सुरूवातीच्या काळात ते एकटे लढवय्या होते. सत्तेसाठी त्यांनी इतर पक्षांच्या दारात पाय ठेवले नाही. कांशीराम यांचे जे धोरण ठरेल, त्यानुसारच त्यांनी वागणूक होती. कांशीराम आणि त्यांचो घनिष्ठ संबंध होता. कारण पक्ष चर्चेत नव्हता, अशा स्थितीतही सरवदे यांनी पक्षाची निळी निशाणी सोलापुरात फडकत ठेवली होती हे काशीराम यांनी पाहिले होते. सोलापूर लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था अशा निवडणुकांची सारी भिस्त राहुल हेच सांभाळत असत.





यानिमित्ताने एक प्रसंग आठवतो. सरवदे यांनी काशीराम यांना सोलापूरला निमंत्रित केले होते. त्यांचा मान राखत कांशीराम सोलापूरला आलेही. नार्थकोर्टच्या मैदानावर त्यांची सभा होती. भव्य व्यासपीठ उभारण्यात आले होते. समोर कार्यकर्ते थोडेच होते पण कांशीराम यांच्या भाषणात वैचारिक ताकत होती. ही ताकत कार्यकर्त्यांना बूस्टर ठरली. सरवदे यांना आता नव्या पिढीशी जुळवून घेत पक्षाची नव्याने उभारणी करावी लागेल. जुन्या-नव्या कार्यकर्त्यांना एकत्र आणून बांधबंदिस्ती करावी लागेल. पदांचे विक्रेंदीकरण करावे लागेल. तरच पक्ष वाढेल व सत्ता ठरवण्यासाठी निर्णायकी पक्ष म्हणून हा पक्ष उदयास येईल. बदलत्या राजकीय स्थितीत हे काम करायचे झाल्यास सरवदे यांची एकप्रकारे कस लागणार आहे. बहुजन समाज पक्षाच्या 'पुनश्च हरि ओम'ला सुराज्यच्या शुभेच्छा.

### बामसेफ आणि कांशीराम

आजच्या पिढीसाठी इतिहासाचे संदर्भ सांगावे लागतील. ६ डिसेंबर १९७८ यादिवशी पुण्याचे डी. के. खापर्डे व कांशीराम यांनी बामसेफ (बॅकवर्ड ॲन्ड मायनॉरिटी कम्युनिटीज एंप्लॉयीज फेडरेशन) या संघाची स्थापना पुणे येथे केली. सामाजिक व्यवस्था परिवर्तन हे बामसेफचे दीर्घकालीन उद्देश आहे. 'राष्ट्रपिता जोतीबा फुले आणि राष्ट्रनिर्माते भिमराव रामजी आंबेडकर' ही विचारधारा प्रमाण मानून बहुजन , मूलनिवासी ही वैचारिक संकल्पना पुनर्जीवित करण्याचे श्रेय या संघटनेला जाते. बामसेफच्या वतीने सोलापुरातही परिसंवाद होत असतात. कांशीराम हे नाव घेतले की डोळ्यासमोर सर्वात आधी येतो तो उत्तर प्रदेश. पण अनेकांना हे बहुधा माहिती नसेल की ज्या कांशीरामांनी उत्तर प्रदेशात बहुजनांच्या राजकारणाचा पाया रचला, ते कांशीराम मूळचे पंजाबचे होते. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे कांशीराम यांनी त्यांच्या राजकारणाची सुरुवात महाराष्ट्रातून केली होती. तरीही महाराष्ट्रातली आंबेडकरी चळवळ बहुजन समाज पक्षापासून अंतर राखून का आहे? असा सवाल जाणकार आंबेडकरी अनुयायांकडून आजही विचारला जातोय.

## थोडक्यात...



महाराष्ट्र राज्य गो सेवेचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांचे सोलापुरात आल्यावर स्वागत करताना केके प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोमनाथ केंगनाळकर. सोबत सिद्रामाप्पा तंबाके, राजेंद्र येमुल आदी.



### राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत तीन सुवर्ण, तीन रौप्य व सहा कांस्य पदके

**सोलापूर :** भारतीय शालेय क्रीडा महासंघ मान्यताप्राप्त भारतीय किक बॉक्सिंग महासंघाच्या मान्यतेने महाराष्ट्र किक बॉक्सिंग असोसिएशन व सोलापूर जिल्हा किक बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज येथे आयोजित करण्यात आलेल्या ३५ व्या राज्यस्तरीय किक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सोलापूर जिल्ह्याने दोन सुवर्ण, तीन रौप्य व सहा कास्यपदकांची कमाई केली. प्राविण्यप्राप्त खेळाडूंची राष्ट्रीय किक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजय प्राप्त खेळाडूंना राष्ट्रीय पंच व मुख्य प्रशिक्षक भीमराव बाळगे, इकबाल शेख व सहाय्यक प्रशिक्षक सुरेश सोनवणे, धनंजय धेंडे, मनोज बाळगे, अमोल घोडके, राहुल सोनकांबळे, प्रचिता जोगदंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**विजयी खेळाडू :** १४ वर्षाखालील गट, २५ किलो खालील, श्रुती काटकर, शौर्य दुधगुंडी, सतरा वर्षाखालील, ४२ किलो, ओम फुटाणे, तिघे सुवर्ण, दहा वर्षाखालील, २० किलो, आरुष रेळेकर, बारा वर्षाखालील, २२ किलो, अक्षरा सोमा, १४ वर्षाखालील, ४७ किलो, जयवर्धन गवळी, तिघे रौप्य, दहा वर्षाखालील, ३७ किलो, क्रिशिव पटेल, बारा वर्षाखालील, ३२ किलो, ऋतुजा भास्कर, ५२ किलो, मयुरेश हुमनाबादकर, १४ वर्षाखालील, ३२ किलो, शर्वरी वाघमारे, ४६ किलो, रिया तांबोळी, सतरा वर्षाखालील, ६६ किलो, धैर्य भद्रे. सर्व सहा कांस्यपदके विजयी खेळाडूंचे जिल्हा किकबॉक्सिंग असो.चे अध्यक्ष महादेव चाकोते, महाराष्ट्र किकबॉक्सिंग असो.चे उपाध्यक्ष मनीष सुरवसे, मुकुंद जाधव, शिवकुमार पाटील, अनुजा कुलकर्णी, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, गणेश पवार यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### रिपाइंच्यावतीने शालेय साहित्याचे वाटप

**वेळापूर :** अकलूज येथे रिपाइंच्यावतीने महावीर जैन विद्यालयात रिपाइं आठवले प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी रिपाइं युवक राजा उपाध्यक्ष, किरणतात्या धाईंजे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोरे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, अभिजीत वाघमारे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, आसिफ शेख, विशाल भोसले, भीमसेन खरे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### बोरगावच्या श्रीनाथ विद्यालयाचे यश

**वेळापूर :** बोरगाव (ता. माळशिरस) येथील श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार ऊर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय बोरगावमधील इ. १२वीमधील विद्यार्थी सुमित संतोष कोळी याची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शुक्रवार दि. २५ ऑगस्ट २०२३ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, पिलीव येथे तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा संपन्न झाल्या. १९ वर्षाखालील वयोगटात ७० किलो वजन गटात त्याचा प्रथम क्रमांक येऊन त्याची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल त्याचे स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन राजकुमार पाटील, माजी पं. स. सदस्या व शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कुमुदिनी पाटील, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य डॉ. रमेश बिडवे व सुधीर कपडेकर, विद्यालयाचे प्राचार्य के. टी. कांबळे, उपमुख्याध्यापक एम. एस. भुजबळ, पर्यवेक्षक आर. टी. लष्कर सर्व सेवकवृंद व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे. त्यास क्रीडा शिक्षक रोडगे व भांगरे यांचे मार्गदर्शन लाभले.

### इंडियन आयडॉल नव्या रूपात

**मुंबई :** सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनवरील गायन रिॲलिटी शो इंडियन आयडॉल पुन्हा एका नव्या हंगामासह परतला आहे. ऑडिशन द्यायला या. पत्ता आहे-नाहर इंटरनॅशनल स्कूल, नाहर्स अमृतशक्ती, चांदिवली फार्म रोड, ऑफ साकीनाका रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००७२. यंदाच्या सीझनमध्ये इंडियन आयडॉल तुम्हाला एका अद्‌भूत प्रवासावर नेणार आहे.

### ५० हजार कोटींचा टप्पा पार

**सोलापूर :** भारतातील आघाडीच्या आणि वैविध्यपूर्ण नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी एक असलेल्या आणि बजाज फिनसर्व्हचा एक भाग असलेल्या बजाज फायनान्स लिमिटेडच्या मुदत ठेवींनी आज ५० हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडल्याचे कंपनीने जाहीर केले.

### नसीरूद्दीन शाह यांचा नवीन लघुपट भेटीला

**सोलापूर :** रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट लार्ज शॉर्ट फिल्म्सने मोटली मूव्हीज ॲण्ड ट्रिगर प्रॉडक्शन्ससोबत सहयोगाने आज त्यांचा नवीन लघुपट 'मॅन वुमन मॅन वुमन'च्या रीलीजची घोषणा केली. दिग्गज अभिनेते व चित्रपट निर्माते नसीरूद्दीन शाह यांचे लेखन व दिग्दर्शन असलेला हा २६ मिनिटांचा चित्रपट दोन पिढ्यांमधील प्रेम व सहवासाच्या अद्वितीय कथेला सादर करतो.

# साखर कारखान्यांची 'उद्दिष्टपूर्ती'साठी तर शेतकऱ्यांची 'ऊस जगविण्या'साठी धडपड

- २ लाख ४० हजार हेक्टर लागवडीत पाणीबाणीची शक्यता
- ऊस पट्ट्यातील शेतकरी धास्तावला

**सुराज्य/सोलापूर**

जिल्ह्यात पाऊसाने दगा दिल्याने यंदाच्या गाळप हंगामात साखर कारखान्यांची 'उद्दिष्टपूर्ती'साठी तर शेतकऱ्यांची 'ऊस जगविण्या'साठी धडपड सुरू असून गाळप हंगामावर विपरीत परिणाम होऊन कमी साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त होत आहे. हा अंदाज खरा ठरल्यास साखर कारखान्यांना आपल्या गाळपाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी धडपड करावी लागेल, अशी चिन्हे आहेत. विशेष करून ज्या कारखान्यांनी गेल्या दोन वर्षांत गाळप क्षमता वाढविली अशा कारखान्यांना यंदा कमी गाळप क्षमतेने हंगाम चालवावा लागणार आहे. याचा विपरित परिणाम कारखान्यांच्या आर्थिक ताळेबंदावरही होणार आहे. तर दुसरीकडे महागडी खते देऊन वाढविलेला ऊस डोळ्यादेखत वाळून जात असल्याने तो जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. आगामी १५ दिवसात पाऊस न पडल्यास २ लाख ४० हजार हेक्टर लागवड असलेल्या जिल्ह्यात पाणीबाणी निर्माण होण्याच्या भितीने ऊस पट्ट्यातील शेतकरी धास्तावला आहे.

सोलापूर जिल्ह्यात असणाऱ्या सहकारी व खाजगी साखर कारखान्यांची दैनिक गाळप क्षमता १ लाख ५० हजार मे. टन इतकी असून गेल्या दोन वर्षांत विशेष करून जिल्ह्यात अनेक साखर कारखान्यांनी कारखान्याचा फायदा वाढविण्यासाठी गाळप क्षमतेत वाढ केली. राज्यात नवे साखर कारखाने सुरू होण्याचा वेग कमी असला तरी अनेक मोठ्या साखर कारखान्यांनी गाळप क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे अनेक भागात नवा कारखाना उभारल्यासारखीच स्थिती आहे. जिल्ह्यात कडक ऊन आणि सुसाट वारा असल्याने उस उत्पादक उपलब्ध स्रोताद्वारे उसाला पाणी देत आहेत. यंदा नैसर्गिक हवामान अनुकूल नसल्याने उसाची वाढही अपेक्षित झालेली नाही. यामुळे उत्पादनात घट निश्चित मानली जात आहे.

जिल्ह्यात लागवड झालेल्या २ लाख ४० हजार हेक्टरमधून सुमारे १ लाख ५० हजार मे. टन ऊस गाळपास उपलब्ध होईल, अशी शक्यता आहे. ऊस हंगामात किमान पाच महिने (१५० दिवस) कारखाने चालणे गरजेचे आहे, परंतु गाळप क्षमता प्रतिदिन दिडलाखांपर्यंत अपेक्षित धरल्यास कारखाने तीन ते सव्वा तीन महिनेच चालतील, एवढाच ऊस उपलब्ध होणार आहे.

राज्याची प्रतिदिन गाळप क्षमता ८ लाख ८२ हजार ५५० टन एवढी आहे. त्यानुसार, गेल्या हंगामात राज्यातील २२ जिल्ह्यांतील कारखान्यांकडून १०५२ लाख टन उसाचे गाळप झाले होते. यंदा १४ लाख ३७ हजार हेक्टरवर उसाची लागवड करण्यात आली आहे. मात्र, ऊस पट्ट्यात समाधानकारक पाऊस झालेला नाही. ऊस उत्पादनात आघाडीवर असलेल्या कोल्हापूर, सांगली, सोलापूर सारख्या जिल्ह्यांमध्ये पावसाने ओढ दिली आहे. परिणामी यंदा प्रत्यक्षात ९७० लाख टनांइतके ऊस गाळप होण्याचा अंदाज असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे ८३ लाख ९१ हजार टनांनी गाळप कमी होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यातून इथेनॉल निर्मितीकडे १५ लाख टन साखर वळवली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुमारे ९४ लाख टन साखरेचे उत्पादन हाती येण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी १०५ लाख ३१ हजार टन साखरेचे उत्पादन झाले होते. त्या तुलनेत यंदा सुमारे बारा लाख टनांनी साखरेचे उत्पादन कमी होईल, अशी माहिती साखर आयुक्तालयाकडून देण्यात आली.



यंदा राज्यात पावसाने चांगलीच ओढ दिली आहे. त्याचा ऊसाच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. या संदर्भात पुढील आठवड्यात बैठक घेऊन ऊसाच्या पिक परिस्थितीचा अंतिम आढावा घेतला जाणार आहे.

**- डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, साखर आयुक्त.**

## नाट्य परिषदेचा रंगवर्धन उपक्रम

# स्वाक्षरीवरून भविष्य बदलू शकते : राजूरवार

**सुराज्य/सोलापूर**



अ. भा. मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्यावतीने सुरू असलेल्या रंगवर्धन उपक्रमात सोलापुरातील स्वाक्षरीतज्ञ सुनील राजूरवार यांचे व्याख्यान संपन्न झाले. ३० वर्षाच्या अभ्यासातून आणि निरीक्षणातून त्यांनी स्वाक्षरीच्या माध्यमातून विविध विषयांना स्पर्श केला.

माणूस हा अनाकलनीय प्राणी आहे. पण प्रत्येकाला या जीवनात मोठे होण्याची इच्छा असते. ते होत असताना त्याच्या जीवनात तितक्याच समस्या सुद्धा उद्‌भवतात, अर्थात या समस्या माणूस स्वतःच उद्‌भवून घेतो, त्या उद्‌भवू नयेत आणि आपले जीवन आनंदी व सुखी व्हावे असे वाटत असेल, तर स्वाक्षरीत काही दोष आहेत का? ते पाहून तो दूर केला पाहिजे. कारण स्वाक्षरीमधून अनेकांचे भविष्य बदललेले आहे, असे अनेकांचे दाखले देत उदाहरणांसह राजूरवार यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रारंभी राजूरवार यांचे स्वागत व सत्कार नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार किरण फडके यांनी केले.

याप्रसंगी परिषदेचे उपाध्यक्ष अशोक किल्लेदार, प्रमुख कार्यवाह प्रा. जोतिबा काटे, सहकार्यवाह सुमित फुलमामडी, सुहास मार्डीकर, सुनील गुरव, ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, व्यंकटेश रंगम, हिरालाल धुळम, प्राचार्य नरसिंह आसादे, राजाराजेशचंद्र, सुनंदा शेंडगे, गितेश चुळभरे आदी मान्यवर उपस्थित होते.



# यशोधन नागरी पतसंस्थेचा शुभारंभ

## पहिल्याच दिवशी १ कोटीच्या ठेवी जमा

**सुराज्य/सोलापूर**

यशोधन नागरी सहकारी पतसंस्थेचा शुभारंभ पहिल्या दिवशी खातेदारांनी १ कोटी रुपयाच्या ठेवीने केला. शनिवार .२६ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले यावेळी कृष्णा गवारे , चेअरमन काशिनाथ पुजारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

चेअरमन काशिनाथ पुजारी म्हणाले शहरातील विजयपूर रोड सैफुल येथील नागरिकांच्या सेवेत यशोधन नागरी सहकारी पतसंस्थ रविवार पासून सुरू करण्यात आली आहे. यामुळे खातेदार,व्यापारी, नौकरदार,युवा उद्योजक,बचतगट ठेवीदारांना शहरात बँकिंग सेवा उपलब्ध झाली आहे. यशोधन पतसंस्थेच्या वतीने ग्राहकांना रिझर्व बँकेच्या नियमानुसार दर्जेदार अत्याधुनिक बँकींग सेवा, चांगला परतावा देण्यात येणार असून ग्राहकांचा विश्वास संपादन करून नवा उद्योजक, नवा व्यवसायिक घडवण्यासाठी आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न असणार आहे.


पतसंस्थेचे चेअरमन काशिनाथ पुजारी अनेक वर्षांपासून बँकिंग क्षेत्रात कार्यरत आहे. सहकार क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या ग्रामीण भागातून आलेला पुजारी हे १०० युवकांना, महिलांना पतसंस्थेच्या माध्यमातून कमीत कमी कागदपत्रांमध्ये कर्ज व आर्थिक मदत देऊन सक्षम बनवण्याचे ध्येय ठेवतो हे कौतुकास्पद आहे. असे मत उदघाटक प्रा.काकासाहेब कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

# २०० कोटींची विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

**सुराज्य/सोलापूर**

पीडब्ल्यू (फिजिक्सवाला) या युनिकॉर्न एज-टेक कंपनीने भारतात व्यापक प्रमाणावर शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी पीडब्ल्यूएनसॅट २०२३ च्या (फिजिक्सवाला नॅशनल स्कॉलरशिप कम ॲडमिशन टेस्ट) लॉंचची घोषणा केली आहे.

यावर्षी फिजिक्सवाला पीडब्ल्यूएनसॅट परीक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २०० कोटी रूपयांची शिष्यवृत्ती देखील देणार आहे.



# जगामध्ये मंदी परंतु भारतात संधी : प्रा. डॉ. विजय काकडे

**सुराज्य/सोलापूर**

'विद्यार्थांनी शेअर बाजारातील गुंतवणुकीचे बारकावे स्वत: जाणून घ्यावेत. आपल्याकडील लहान प्रमाणावरील निधी अगदी दहा रुपयापासून शेअर बाजार आणि त्याच्याशी निगडीत व्यवहारात गुंतवणूक करण्यास सुरुवात करावी. देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासात आपलाही सहभाग असावा, असे आवाहन करीत प्रा. डॉ. विजय काकडे यांनी जगात मंदी असली तरी भारतात संधी असल्याचे सांगितले.

वसुंधरा महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्यावतीने 'शेअर बाजार आणि त्यातील रोजगाराच्या संधी' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'विद्यार्थांचा वर्तमान व भविष्यकाळातील जीवन पद्धती, त्यांच्यासमोरील आव्हाने आणि रोजगाराच्या संधी' याविषयावर डॉ. काकड यांनी मार्गदशर्न केले.

दोन सत्रात चाललेल्या या कार्यशाळेत प्रथम सत्रात बोलताना डॉ. सुवर्णा सुर्यवंशी यांनी 'शेअर बाजार आणि त्यातील सरलता' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याने सर्वगुण संपन्न होताना विविध प्रकारची व्यावसयिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी ब्रिज कोर्सेस करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यशाळेच्या अध्यक्षीय आढाव्यात प्राचार्या डॉ. मीना गायकवाड यांनी येणाऱ्या भविष्यकाळात अनेक आव्हाने आपल्यासमोर येणार आहेत. रोजगारीचा प्रश्न अगदीच बिकट होत चालला आहे. प्रत्येक क्षेत्रात निर्माण झालेली प्रचंड स्पर्धा, मंदीचे वातावरण, जीवनविषयक वस्तूंच्या वाढत्या किमती, सरकारची खाजगीकरणाकडे होणारी वाटचाल या सर्व बाबी विचारात घेता आजच्या तरूण पिढीने स्वतःला सक्षम करावे लागेल, असे सांगितले.

कार्यशाळेचा उद्देश आणि प्रास्ताविक प्रा. डॉ. राजाराम पाटील, परिचय प्रा. डॉ तानाजी देशमुख, आभार प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. बापू राऊत यांनी केले.

# जागृत मारूती अन्नछत्र मंडळात भक्तीचा सागर

**सुराज्य/अक्कलकोट**



श्रावणमासनिमित्त गौडगाव येथील दक्षिणमुखी जागृत मारूतीच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणासह अन्य राज्यातील हजारो भाविकांनी शांततेत मारुती चरणी लीन झाले. यामुळे जागृत मारूती अन्नछत्र मंडळात भक्तीचा सागर दिसून आला.

शनिवारी ४ वाजल्यापासून दक्षिणमुखी जागृत मारूतीच्या दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. शनिवारी पहाटे ३ ते ५ यावेळेत भाविकांनी मारूतीस महारुद्राभिषेक केले. ५ ते ६ पर्यंत होमहवन तर ७ वाजता महाआरतीचा विधी पार पडला. दुपारची पूजा महादेव गिरमल हुल्ले दिंडूर यांना मान मिळाला. हैदराबाद, तेलंगणा येथील शिवकुमार सुभेदार व त्यांचे पुत्र रितेश व हनुमंतराव यांच्यावतीने श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात एक दिवसाचे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, उपाध्यक्ष सिद्राम वाघमोडे, सचिव प्रकाश मेंथे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# तब्बल १४१ जणांच्या खात्यावर जमा झाले १० हजार रुपये

## प्रधानमंत्री स्वनिधी योजनेसाठी माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांचा पुढाकार; लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप

**सुराज्य/सोलापूर**

प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत १४१ पथविक्रेते तसेच छोट्या व्यावसायिकांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा लाभ मिळाला. माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख यांच्या पुढाकाराने राबवलेल्या या योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप रविवारी माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

शेळगी येथील वैष्णवी हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख, भाजपा शहर उत्तर विधानसभा प्रमुख राजकुमार पाटील, वीरेश उंबरजे, मंडल अध्यक्ष सुधाकर नराल, ज्ञानेश्वर कारभारी, शेखर इगे, सचिन लड्डा, दत्ता बडगु, धोंडप्पा नग्गे आदी उपस्थित होते.

प्रारंभी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. यानंतर लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. देशमुख म्हणाले, पथविक्रेते छोट्या व्यावसायिकांना आपला व्यवसाय सुरू करण्यासाठी, व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी विनातारणी १० हजार रुपये कर्जरूपाने देण्याची योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केली आहे.

देशभरातील हजारो छोटे व्यवसायिक याचा लाभ घेत आहेत. सोलापुरातील इच्छुक विक्रेत्यांनीही याचा लाभ घेण्यासाठी कार्यालयाशी संपर्क साधावा. पहिल्यावेळी देण्यात आलेल्या १० हजार रुपयांची परतफेड वेळेत केली तर दुसऱ्यावेळी २० हजार रुपये तर त्यानंतरच्या टप्प्यात तब्बल ५० हजार रुपयांचे कर्ज मिळणार आहे. अशा अनेक योजना मिळवून देण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते कायम तत्पर आहेत. त्याचा विक्रेत्यांनी नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही डॉ. किरण देशमुख यांनी याप्रसंगी केले.




या कार्यक्रमास उमेश कोळेकर, महेश जवळोटे, सागर माने, सिद्धू भिमदे, संतोष बंडगर, भैरू कांबळे, साईप्रसाद पाटील आदी उपस्थित होते.

दैनिक सुराज्य सोलापूर
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सोलापूर महापालिका कामगार कृती समिती
- प्रदिप जोशी
- बाली मंदेकु
- तेजस्मिता कासार
- दत्ता कळसे
- राशी क्षीरसागर
- आबासाहेब क्षीरसागर
- अजय क्षीरसागर
- लिंबराज जेटिथोर
- विद्यासागर मस्के
- भारत क्षीरसागर

मा.श्री.अशोक जानराव

सुराज्य सोलापूर
सुराज्य
२१
वा वर्धापन दिन विशेष

दैनिक सुराज्यच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब
मा.श्री.रमेश बागवे
मा.श्री.अविनाश बागवे
मा.आ.प्रणितीताई शिंदे
शुभेच्छुक
मा.श्री.रामभाऊ वाघमारे
सोलापूर जिल्हाध्यक्ष मातंग एकता आंदोलन
मा.श्री.महेश लोंढे
युवक आघाडी अध्यक्ष सोलापूर जिल्हा

दै.सुराज्यच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
आण्णा
मा.सुरेश पाटील
माजी सभागृह नेता, सोमपा
मा.सुरेशआण्णा पाटील
मित्र परिवार, सोलापूर

आशिर्वाद
स्व.सुधाकर परिचारक
दैनिक सुराज्य सोलापूर
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
मा.आ.प्रशांत परिचारक
मा.आ.बबनदादा शिंदे
युवा नेते
मा.सभापती पंचायत समिती पंढरपूर
मा.उमेश परिचारक
मा.वामनराव माने
शुभेच्छुक
सुभाष बापूराव माने
मा.जिल्हा परिषद सदस्य
मु.पो.ईश्वर वठार, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

दैनिक सुराज्य सोलापूर
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.प्रकाश (काका) वानकर
मा.श्री.दत्ता (पंत) वानकर
मा.श्री.विठ्ठल वानकर
शुभेच्छुक
मा.नगरसेवक
गणेश (दादा) वानकर

दैनिक सुराज्य सोलापूर
२१ व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!
मराठवाडा क्रांतीसूर्य संस्थापक अध्यक्ष
जिल्हाध्यक्ष
कै.आण्णासाहेब जावळे-पाटील
छावा
मा.श्री.अमोल पाटील
अमोल (भैय्या) पाटील
अखिल भारतीय छावा संघटना

दैनिक सुराज्य सोलापूर
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
युवा उद्योजक
Mob.:7020511175
मा.श्री. समीरभाई कटरे
वळसंग, ता.द.सोलापूर
Hotel RK
Dhaba & Resto
• VEG • NON VEG
- साऊथ इंडियन
- पंजाबी
- थाळी
- मटन
- मच्छी
- तंदुर
- चिकन
- कोल्ड्रींक्स

Valsang, Tal.S. Solapur

दैनिक सुराज्य सोलापूर
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
मातोश्री कै. शांताबाई हत्तुरे महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.इंगळगी, तालुका-दक्षिण सोलापूर
(दक्षिण सोलापूर तालुका कार्यक्षेत्र)
चेअरमन-अश्विनी शिवानंद हत्तुरे
व्हाईस चेअरमन-सरस्वती औदुसिद्ध कोटे
व्यवस्थापक-राजशेखर लक्ष्मण बंडगर
अद्ययावत सेवा-सुविधेने सुसज्ज कार्यालय
एटीएम आणि एसएमएस सेवा
पिग्मी योजना, मुदत ठेव योजना, तात्काळ कर्ज, सुवर्ण कर्ज, आकर्षक व्याजदार

दैनिक सुराज्य सोलापूर
२१ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
राज्याचे मुख्यमंत्री
आरोग्यमंत्री
खासदार
मा.ना.श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब
मा.ना.श्री.डॉ.तानाजीराव सावंत साहेब
मा.श्री.खा.डॉ.श्रीकांत शिंदे साहेब
सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख
युवा सेना जिल्हाप्रमुख
शिवसेना
शुभेच्छुक
मा.श्री.प्रियदर्शन (भैय्या) साठे
मा.प्रा.श्री. शिवाजीराव सावंत सर
भावी आमदार
युवा सेना सोलापूर शहर व जिल्हा

Dattatray S. Mule
Govt. Contractor
State Chairman Builders Association of India Maharashtra.
दैनिक सुराज्य सोलापूर
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
- DIGVIJAY READYMIX CONCRETE
- DIGVIJAY CONSTRUCTION & HOT MIX
- DIGVIJAY TRADERS
- DIGVIJAY INFRACON

2, Smruti Prakash Towers, Opp. Kinara Hotel, Apex Hospital, Hotgi Road, Solapur.
datta.mule99@gmail.com Mob.- 9822023939